# गाऊया तेजाची आरती

डॉ. अनिल गोडबोले



सेनापती बापट

BVBK-0402878

सेनापती बापट.

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
क्र. २८७८ दिनांक ११।१।८४
विषय ओ।-वा. क्र. ........

BVBK-0402878

उन्मेश प्रकाशन (९८)

सेनापती बापट
(गाऊया तेजाची आरती - ५)

प्रकाशक - मुद्रक
मेधा राजहंस
**उन्मेष प्रकाशन**
२६ पर्वती, पुणे ४११ ००९

© डॉ. अनिल गोडबोले
३७९, शनिवार पेठ,
लिमये बिल्डींग

मूल्य : तीस रुपये.

प्रथमावृत्ती
१५ ऑगस्ट १९९३

मुखपृष्ठ
धनंजय सस्तकर

आतील चित्रे
डॉ. भैय्यासाहेब ओंकार

टाईपसेटिंग
पॉप्युलर टाईपरायटिंग रुम
६५२ नारायण पेठ,
अप्पा बळवंत चौक,पुणे ४११०३०
फोन नं ४५१७५०.

क्र. २८७८ दिनांक ....
विषय आ - वा - क्र.............

# अनुक्रमणिका


आधी हे वाचा !

१) निश्चयाचे बळ

२) शुभमंगल

३) श्रीहरीची हाक

४) देशाचा संसार

५) बॉंब-विद्येचे रहस्य

६) रोमहर्षक अज्ञातवास

७) सुटका झाली, पुढे काय ?

८) लोकमान्यांच्या सहवासात

९) तात्या सेनापती झाले

१०) मुलांचे तात्या

११) दोन पांडुरंग

१२) रात्रंदिन युद्धाचाच प्रसंग

१३) श्रीहरीचे बोलावणे आले

- सेनापतींच्या कविता
- सेनापतींच्या जीवनातील प्रसंग-विशेष.
- हे सुद्धा वाचायला हवे !

# आधी हे वाचा !

बाळ गंगाधर टिळक यांच्यामागे लोकमान्य ही बिरुदावली कशी चिकटली ? मोहनदास करमचंद गांधी यांना महात्मा कोणी केले ? विनायक दामोदर सावरकर यांना स्वातंत्र्यवीर का म्हणावयाचे ? बादशहाच्या तीन निरनिराळ्या प्रश्नांचे बिरबलाने एकच उत्तर दिले. त्याच प्रमाणे वरील तीन प्रश्नांचे उत्तर एकच. या तीन महान् नेत्यांचे कर्तृत्त्व पाहून लोकांनीच त्यांना आपणहून प्रेमाने अशा बिरुदावल्या दिल्या. सेनापती बापट यांच्या बाबतही असेच म्हणता येईल. पांडुरंग महादेव बापट यांच्या पाठीशी प्रत्यक्ष सैन्यदलात काम केल्याचा कोणताही अनुभव नव्हता. पण मुळशी-सत्याग्रहानंतर लोकांनीच त्यांना आपणहून सेनापती मानले. मुळशीचा सत्याग्रह संपला, तरीही बापटांच्या मागे सेनापतीपद चिकटले ते कायमचे. हैद्राबादचा सत्याग्रह, पंढरपूर येथील मंदिर-प्रवेश-सत्याग्रह, संयुक्त महाराष्ट्र-लढा, गोवा-मुक्ती-संग्राम, अशा प्रत्येक संघर्षात सेनापती हिरिरीने उतरले. किंबहुना शत्रूशी लढता लढता आपल्याला वीरमरण यावे, अशी त्यांची इच्छा होती, पण मृत्यूने प्रत्येक वेळी त्यांना हुलकावणी दिली. बापट सेनापती तर होतेच. पण पु. पा. गोखले यांनी यापुढे जाऊन त्यांना संत सेनापती म्हटले. याचे कारण म्हणजे वर वर पाहता, लढाऊ वृत्ती धारण करणाऱ्या या सेनापतीचे अंत:करण मात्र संतांसारखेच निर्मळ आणि मृदू-मुलायम होते. इंग्रजांच्या जुलमी राजवटीविरुद्ध विलक्षण चीड असणाऱ्या या संत सेनापतींच्या मनात, मुळशी भागातील गरीब शेतकऱ्यांची गाऱ्हाणी दूर व्हावीत यासाठी कमालीची कणव होती. सेनापतींचे विचार क्रांतिकारक होते, पण त्यांची वृत्ती आध्यात्मिक होती. श्रीहरीवर तर त्यांची विलक्षण श्रद्धा होती. देशसेवेची प्रतिज्ञा घेताना सुद्धा त्यांनी श्रीहरीचाच कौल घेतला. महाराष्ट्रात सेनापती बापट व साने गुरुजी या दोन पांडुरंगांची युती झाली, त्याचे कारण, या दोन महान् व्यक्तींच्यामधील संतपण हेच आहे.

सेनापती बापटांचे वैशिष्ट्य असे की, ज्या हातात त्यांनी बाँब व पिस्तुले यांसारखी शस्त्रे लीलया खेळवली, त्याच हातांनी त्यांनी लोकांना झाडूचे लालित्य काय असते हेही दाखवून दिले. कारण ही दोन्ही कामे सारखीच पवित्र आहेत, अशीच त्यांची धारणा होती. माणिकतोळा-बाँबस्फोट-प्रकरणातील माफीचा साक्षीदार नरेंद्र गोस्वामी उलटला आणि त्याने बापटांचे नाव सांगितले. त्यामुळे ते भूमिगत झाले आणि त्यानंतर ते साडेचार वर्षे अज्ञातवासात होते. त्यांच्या जीवनातील हा सारा कालखंड रोमहर्षक घटनांनी भरलेला आहे. अज्ञातवासातून सुटका झाल्यानंतर काही वर्षे सक्रीय राजकारणात भाग घ्यायचा नाही, असे त्यांच्यावर बंधन घातलेले होते. पुढे काय ? हा त्यांच्यापुढे प्रश्न होता. पण कर्तृत्ववान व्यक्तीला कामाच्या अनेक दिशा गवसतात. सामाजिक कार्यकर्त्याला कोणकोणत्या प्रकारची विधायक कामे करता येणे शक्य आहे, याचे प्रात्यक्षिकच सेनापतींनी करून दाखविले.

सेनापतींनी आयुष्यामध्ये इतकी विविध प्रकारची कामे केली असून सुद्धा, त्यांचे जीवनचरित्र लहानांनाच काय, पण मोठ्यांना सुद्धा फारसे ज्ञात नाही. सेनापती बापट जन्मशताब्दीच्या निमित्ताने त्यांच्या चरित्रकथेचा अभ्यास झाला. ही कथा लहानांसमोर आणि मोठ्यांसमोर अनेकवार सांगून पाहिली. आता ती पुस्तकरूपाने वाचकांसमोर येत आहे.

पुस्तक-लेखनासाठी प्रकाशिका मेधा राजहंस यांच्याकडून वेळोवेळी सतत प्रोत्साहन मिळत आले . निरनिराळ्या ग्रंथालयांनी सेनापती बापट या विषयावर जुन्यांतली जुनी पुस्तके उपलब्ध करून दिली. पुस्तकाची हस्तलिखित प्रत तयार करण्याचे काम अपर्णा निरगुडे यांनी मोठ्या आस्थेवाईकपणे व कमीत कमी वेळात करून दिले. डॉ. भय्यासाहेब ओंकार यांच्या चित्रांमुळे या पुस्तकाची रंगत वाढली आहे. केवळ उपचार म्हणून आभार मानलेले त्यांनाही रुचणार नाही, कारण ही सगळी आमचीच माणसे आहेत. मी त्यांच्या ऋणात राहणेच पसंत करीन. या चरित्रकथेचे, जाणकार वाचक मनापासून स्वागत करतील अशी खात्री आहे.

- अनिल गोडबोले

क्र. क्र. 2408
विषय बा.वा.

# निश्चयाचे बळ

शनिवारचा दिवस. पारनेर गावातील प्राथमिक शाळा. शाळेची मधली सुट्टी झालेली. शाळेच्या आवारात मुले मोकाटपणे हुंदडत होती. काही मुले डबे खात होती, तर काही टोळक्या-टोळक्यांनी गप्पा मारत, हसत, खिदळत होती. व्हरांड्याच्या एका कोपऱ्यात आवटी गुरुजी एका मुलाला खांद्यावर थोपटत काहीतरी समजावत होते, " अरे पांडुरंगा, तू सर्व प्रकारच्या खेळांत चांगला चमकतोस. परवा वर्गात तू संस्कृत श्लोक पण छान म्हटलास. तुझं डोकं सुपीक आहे. जरा थोडं लक्ष घातलंस आणि मेहनत केलीस, तर तू अभ्यासात पण चमकशील. अभ्यासात जर तुझा वरचा नंबर आला, तर तुला इंग्रजी शिकवण्याची व्यवस्था मी करीन."

छोटा पांडुरंग गुरुजींचे शब्द अगदी कान देऊन ऐकत होता. गुरुजी सांगत होते, ते त्याला मनोमन पटत होते.

आवटी गुरुजींच्या सांगण्यात खूपच तथ्य होते. पांडुरंग हा लहानपणापासून फारच हूड. अभ्यासापेक्षाही खेळाकडे ओढा जास्त. काहीसा व्रात्य आणि खोडकरही. उन्हाळ्याचे दिवस. मुलांचा सुरपारंब्याचा खेळ अगदी रंगात आला होता. खेळता खेळता पांडुरंगाच्या हातातली काठी, पाण्याच्या टाक्याभोवतीच्या शेवाळ्यातून घसरली आणि त्या काठीबरोबर पांडुरंगही पाण्याच्या टाक्यात पडला. टाके तसे लहानच, पण पांडुरंग पाण्यात खोलवर गटांगळ्या खाऊ लागला. मुले एकदम घाबरली. सुरपारंब्या खेळता आल्या तरी पोहायला कोणालाच येत नव्हतं. तेवढ्यात पांडुरंगाची शेंडी पाण्याच्या वर

आली. पांडुरंगाच्या थोरल्या भावाने, अप्पाने धोतर वर खोवले, पाण्यात एक पाय पुढे टाकून शेंडी जोराने खेचली आणि पांडुरंगाला पाण्याच्या बाहेर काढले. तो थोडा वेळ बेशुद्ध होता, पण मग हळूहळू शुद्धीवर आला. मुलांचा आरडाओरडा ऐकून घरातील मोठी माणसे जमा झाली.

" काय रे कसली गडबड आहे ?"

दादांचा आवाज ऐकल्यावर सारी मुले चपापली. मग अप्पानेच सारा प्रकार सांगितला,

" तसं विशेष काही नाही दादा, हा पांडुरंग पाण्याच्या टाक्यात खेळता खेळता घसरून पडला आणि लागला गटांगळ्या खायला. मग काय ? धरला त्याच्या शेंडीला आणि खेचला पाण्याबाहेर." अप्पा अगदी सहजपणे सांगत होता, पण आईचा जीव मात्र थाऱ्यावर नव्हता. मुलगा वाचला या आनंदात तिने पांडुरंगाला हृदयाशी कवटाळले. अप्पा सांगत होता,

" आई, या पांडुरंगाने फार दंगा-मस्ती केली तर त्याला सांग. बच्चमजी, तुझी शेंडी आता अप्पाच्या हातात आहे."

लहान वय असल्यामुळे समज कमी होती. पण आवटी गुरुजींचे शब्द मात्र त्याच्या मनात खोलवर रुजले. मनोमन त्याने काहीतरी निश्चय केला. तो तहानभूक विसरून अभ्यासाच्या मागे लागला. मराठी सातवीची परीक्षा झाली. परीक्षा झाल्यानंतर पांडुरंगाने परीक्षेचा विषय डोक्यातून काढून टाकला आणि पुन्हा सुट्टीमध्ये हुंदडायला लागला. सुट्टी संपत आली. सातवीच्या परीक्षेच्या निकालाचा दिवस उजाडला. घरामध्ये सगळीकडे काळजीचे वातावरण. दादांचा तापट स्वभाव सर्वांनाच माहीत होता. आई दादांना समजून सांगत होती, " हे पहा, अप्पाची मला काही काळजी वाटत नाही. पण या पांडुरंगाचाच मला भरवसा वाटत नाही. अजून तसं लहान वय आहे. समज आलेली नाही. त्यामुळे अभ्यासापेक्षा त्याचा खेळण्याकडे जास्त ओढा आहे. तो नापास झाला तर, त्याला उगीच रागावू नका. या वर्षी नाही तरी पुढच्या वर्षी तो नक्की पास होईल."

दुपारी निकाल लागला. जेवण झाल्यावर आईचा जरा डोळा लागला होता. पांडुरंगाने आईला गदागदा हालवून उठवले, " आई मी आणि अप्पा दोघेही पास झालो."

" गजाननच पावला हो " असे म्हणत आईने समाधानाने सुस्कारा सोडला आणि गणपतीपुढे गुळाचा खडा ठेवला.

अप्पा सांगत होता,

" आई, अगं तू उगीचंच पांडुरंगाची काळजी करत होतीस. माझ्यापेक्षाही त्यानंच अभ्यासात जास्त चमक दाखवली. गणितात आणि भाषेत तर पैकीच्या पैकी मार्क मिळाले. आवटी गुरुजी त्याची फार स्तुती करत होते." पांडुरंगाची ही कर्तबगारी पाहून आईला आकाश ठेंगणे झाले.

आवटी गुरुजींची जबाबदारी वाढली. पण ते वचनाचे पक्के होते. इंग्रजी हा त्यांचा शिकवण्याचा विषय नव्हता. मग त्यांनी युक्ती केली. डॉ. साठे त्यांच्या ओळखीचे होते. त्यांच्या मुलाला बीजगणित फुकट शिकवायचे आणि त्या बदल्यात डॉ. साठे यांनी पांडुरंगाला इंग्रजी फुकट शिकवायचे असे ठरले. लहानपणीच पांडुरंगाचा इंग्रजीचा पाया पक्का झाला. मुलाला पुढे शिकवा असा आवटी गुरुजींचा आग्रह. पण घरची परिस्थिती बेताचीच. एकाच वेळी अप्पा आणि पांडुरंग या दोघांचंही शिक्षण कसं होणार ? पण अप्पाने समजूतदारपणा दाखवला. त्याने दादांना सांगितले,

" दादा, माझ्यापेक्षाही हा पांडुरंग हुशार आहे. मला तशी शिकण्याची फारशी आवड नाही. मी इथेच राहीन. नोकरी करीन. शेतीवाडी पाहीन. पण या पांडुरंगाला खूप शिकू द्या."

पुढच्या शिक्षणासाठी पांडुरंग पुण्यात आला. लहानपणी हूड असणारा हा पांडुरंग मॅट्रिकच्या परीक्षेत त्या वेळच्या मुंबई इलाख्यात पहिला आला आणि संस्कृत विषयात त्याने जगन्नाथ शंकरशेठ शिष्यवृत्ती मिळवली. हा चमत्कार कसा झाला ? आवटी गुरुजींच्या शब्दाने पांडुरंगाला प्रेरणा मिळाली असणार, पण या यशामागे उभे होते ते निश्चयाचे बळ.

लहानपणीचा हा पांडुरंग म्हणजेच चरित्रकथेचे नायक पांडुरंग महादेव ऊर्फ सेनापती बापट.

***

# शुभमंगल

कर्तृत्ववान् व्यक्तीच्या जीवनात विवाह ही बेडी ठरते का ? लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, वासुदेव बळवंत फडके अशा अनेकांनी ध्येयवेडे जीवन जगण्यासाठी संसाराकडे पाठच फिरवली होती. सेनापती बापटांच्या बाबतीतही जवळपास हाच प्रकार होता.

नगरच्या शाळेत शिकत असतानाच दादांनी पांडुरंगासाठी मुली पहायला सुरुवात केली. त्या काळातील मात्यापित्यांना, आपल्या मुलामुलींचे दोनाचे चार हात, इतक्या लहान वयातच करण्याची का घाई वाटावी हे कोडे उलगडत नाही. मुलगी पाहताना तिचे कुलशील चांगले आहे ना ? घर खाते पिते आहे ना ? आणि मुख्यत: पत्रिका जुळते ना ? या गोष्टी पाहिल्या जायच्या. आपला जोडीदार कसा असावा, या बाबत मुलामुलींची मते विचारात घेण्याची प्रथाच नव्हती. नगर जिल्ह्यातल्या सोनई गावच्या मोरेश्वर भाव्यांची मुलगी पांडुरंगासाठी निवडण्यात आली. घरामध्ये लग्नाची चर्चा चालू झालेली. यंदा तर मॅट्रिकचे वर्ष असल्यामुळे अभ्यासात पूर्णत: झोकून दिलेले. त्यात मध्येच ही लगीनघाई कशाला ? मुळात लग्न करायचे की नाही, याचाही विचार केलेला नव्हता. पांडुरंग मनाने अस्वस्थ झाला. दादांच्यापुढे बोलण्याचे धाडस नाही, पण बंडखोर मन स्वस्थ बसू देईना. काहीतरी विचार पक्का झाला आणि मग पांडुरंगाने भावी सासऱ्याला पत्र लिहिले, " जीवनाची ध्येयनिश्चिती अजून झालेली नाही. तूर्त तरी लग्नाचा विचार नाही."

आपल्या होणाऱ्या जावयाचे अशा प्रकारचे पत्र पाहून भावे हबकलेच आणि धावत पळत पारनेरला आले. सोनईचे भावे आले आहेत, ही गोष्ट शेजारी-पाजारी समजली. कुणीतरी पांडुरंगाला चिडवले, " सासरा आला रे आला". सासरा आला असे ऐकल्यावर पांडुरंगाने धूम ठोकली आणि तो गावाबाहेर पळाला.

इकडे भाव्यांना अचानक आलेले पाहून दादांना आश्चर्य वाटले. " मी पत्र लिहिणारंच होतो. आपण असं अचानक येणं केलंत ? "

" म्हणजे तुम्हाला काहीच माहिती नाही असं दिसतंय ! हे पहा आमच्या भावी जावयांचे पत्र. ही शिकलेली मुले. पण काय हा अगोचरपणा ! " दादांनी पत्र वाचले आणि त्यांनाही आश्चर्याचा धक्का बसला. मग पांडुरंगाचा शोध सुरू झाला. गावाबाहेरच्या चाफ्याच्या झाडावर हा बसलेला. पण आता त्याची समजूत कोण घालणार ?

शेवटी अप्पा पुढे झाले, " अरे पांडुरंगा, सोनईचे भावे आले आहेत. तुझ्या पत्रामुळे दादा खूप रागावले आहेत. लग्न न करण्याचं हे काय खूळ डोक्यात घेतलंस ? आपण अब्रूनं जगणारी माणसं. दिलेला शब्द मोडला तर गावात आपली बदनामी होईल." अप्पांच्या शब्दात जरब होती. त्यांच्या शब्दाकरता पांडुरंग लग्नाला तयार झाला. पण मनात कुठेतरी बंडखोरी होतीच. भाव्यांची यमू बापटांच्या घरी रुक्मिणी होऊन आली. लग्नात सगळ्यांनी आग्रह केला,

" पांडुरंगा नाव घे."

" नाव चांगल उखाण्यात हवं."

पांडुरंगाला लहानपणापासूनच कविता करण्याचा छंद. लोकांनी आग्रह करताच त्याची प्रतिभा खवळून उठली. मनातली बंडखोरीही जागी झाली असावी. त्याने नाव घेतले,

" माझ्या बसायच्या खोलीत गोवऱ्यांची चवड,
रुक्मिणीचे नाव घ्यायची मला फार आवड."

विवाहप्रसंगी गोवऱ्यांची आठवण व्हावी या चमत्कारिक वृत्तीला काय म्हणावे ! ध्येयपूर्तीच्या मागे लागून आपल्या संसाराचा वडवानळ होणार, हे तर यातून सुचवायचे नसेल ?

***

म. गं. मं. ठाणे, ग्रंथालय शाखा.
बाल वाङ्मय ब-११
ना. क्र. २८७६ दिनांक ....
विषय क्र. ........

# श्रीहरीची हाक

पांडुरंग पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिकत असताना, त्या वेळचे पुण्यातील वातावरण काहीसे विचित्र होते. प्लेगची साथ, रॅन्ड या जुलमी अधिकाऱ्याचे प्लेग निवारण्याच्या नावाखाली अत्याचार. गणेशखिंडीत रँड आणि आयर्स्ट या अधिकाऱ्यांचा बळी आणि या कृत्याबद्दल चाफेकर बंधूंना फाशी, या साऱ्या घटनांचा, शाळा शिकणाऱ्या पांडुरंगाच्या मनावर परिणाम होतच होता. प्लेगमुळे शाळा अनियमित. मनाच्या अस्थिरतेमुळे अभ्यासाकडे थोडे दुर्लक्ष. अशा अवस्थेत मॅट्रिकची परीक्षा कशी पार पडणार, याची सर्वांनाच चिंता. पण या परीक्षेत उज्ज्वल यश मिळवून पांडुरंगाने सर्वांना सुखद धक्का दिला.

शाळा शिकत असतानाच पुण्यामध्ये हिंदु-मुस्लिमांची दंगल उसळली. दंगलीमध्ये हातांत सुरे घेऊन भोसका-भोसकीचे प्रकार चालू होते. पण अशा या ऐन दंगलीच्या मोक्याच्या ठिकाणी, गर्दीमध्ये पांडुरंग ताठपणे उभा होता. शिव्या देणाऱ्या आणि सुरा मारणाऱ्या त्या गुंडांकडे तो रागाने पहात होता. समोरूनच त्याच्या शाळेतील व्यायाम-शिक्षक भिडेगुरुजी जात होते. त्यांनी पटकन् पांडुरंगाला मागे ओढले आणि जवळच असलेल्या रास्ते वाड्यात नेले.

" कोण रे तू ? तू तर आमच्याच शाळेचा विद्यार्थी दिसतोस !"
" होय गुरुजी, मी पांडुरंग महादेव बापट."
" काय रे, ते गुंड तुला मारतील अशी भीती नाही वाटली ?"

" छट् ! त्यांना कशासाठी भ्यायचं ? अंगाला हात लावला असता तर त्यांच्या हातांतला सुराच काढून घेतला असता."

भिडे गुरुजी या विद्यार्थ्याकडे पहात होते. त्याची हिंमत पाहून ते मनोमन सुखावले. अशा तेजस्वी तरुणाच्याच ते शोधात होते.

पांडुरंगाने कॉलेजमध्ये नाव घातले. पण शाळेत असतानाचा तो प्रसंग आणि त्या वेळी त्याचे भिडे गुरुजींनी केलेले कौतुक या आठवणी त्याच्या मनाच्या कप्प्यात साठवल्या गेल्या. लोकमान्य टिळक हे तर त्या काळात पुण्यातील तरुणांचे दैवत होते. पांडुरंगाला सुद्धा लोकमान्यांच्या केसरीतील लेखांनी वेड लावले होते. देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपण सुद्धा काही तरी केले पाहिजे, असे वाटत होते. पण अजून जीवनाची ध्येयनिश्चिती झाली नव्हती.

कॉलेजच्या होस्टेलमध्ये असताना एक दिवस भिडे गुरुजी त्याच्या खोलीवर आले.

" वर्तमानपत्रात तुझा फोटो पाहिला. छान यश मिळवलंस. तुला शाबासकी देण्याकरिता मुद्दाम आलो. आता पुढे काय करणार ?"

" सध्या कॉलेज शिकतो आहे."

" ते तर नेहमीचंच आहे. पण तू तेजस्वी आहेस. हिंमत बहाद्दर आहेस. भारतमातेच्या सेवेसाठी आज तुझ्यासारख्या तरुणांची फार गरज आहे."

" पण गुरुजी मला तर राजकारणातलं काहीच कळत नाही."

" राजकारणात पडलास म्हणजे सारं काही समजेल. आपण परकीयांचे गुलाम आहोत, हे तर तुला समजतंय ? आपली भारतमाता मुक्त व्हायला हवी असं तुला वाटतं की नाही ? एवढं पुरेसं आहे. आता मी सांगतो त्या प्रमाणे शपथ घ्यायची."

आणि भिडे गुरुजींनी म्यानातून तलवार उपसली आणि पांडुरंगापुढे धरली. खोलीमध्ये एक प्रकारचे गंभीर वातावरण पसरले. पांडुरंगाने तलवारीवर हात ठेवून शपथ घेतली,

" मी, पांडुरंग महादेव बापट - भवानी- आईची, या नंग्या तलवारीची शपथ घेऊन अशी प्रतिज्ञा करतो की, मातृभूमीला स्वतंत्र करण्यासाठी मी आजपासून यावज्जीव ( जोवर जिवंत आहे तोपर्यंत ) काया, वाचा, मनाने झटेन आणि तिची हाक येताच तिच्या सेवेसाठी धावत येईन. या कामी देहाचा होम करावा लागला तरी मी फिरून याच भरतखंडात जन्म घेईन व अपुरे राहिलेले माझे काम पुरे करून दाखवीन. ही माझी प्रतिज्ञा पुरी करावयास श्रीहरी मला जरूर ती बुद्धी, युक्ती आणि शक्ती देवो. वंदे मातरम् !"

या प्रतिज्ञेतील प्रत्येक शब्दन् शब्द तोलामोलाचा होता आणि पांडुरंगाला उभ्या आयुष्यात या प्रतिज्ञेचे विस्मरण झाले नाही. श्रीहरीवर त्याची **श्रद्धा** होतीच. तरुण वयात श्रीहरीने जी हाक मारली किंवा जी मुरली त्याच्या कानात वाजवली, तिचे सूर आयुष्यभर पुरले. त्या पवित्र वेळेला ते मंगल वेळाच म्हणत.

जीवनाचे ध्येय गवसले. एका देशप्रेमाच्या वेडाने त्यांना पछाडले. त्यांनी स्वत:च लिहिलेल्या काव्यमय आत्मचरित्रातून त्यांच्या मन:स्थितीचे चित्र डोळ्यासमोर उभे राहते.

" आईवरी विपत्ती, आम्ही मुले कशाला ?
बंदीत मायभू ही, आम्ही खुले कशाला ?
रक्ताळले शरीर, भडका जिवात झाला !
आईस सोडवाया, येणार कोण बोला ?"

***

# देशाचा संसार

पुण्यात कॉलेजमध्ये शिकत असताना बापटांच्या बुद्धीची चमक विद्यार्थ्यांना, तसेच प्राध्यापकांनाही जाणवली. पण भिडे गुरुजींच्या प्रतिज्ञेने त्यांच्या मनाला देशप्रेमाचे जे वेड लागले, ते आयुष्यभराचे. कॉलेजमधील विद्यार्थ्यांत १८५७ च्या स्वातंत्र्य- युद्धाबाबत चर्चा चालली होती. ' बंडवाल्यांना इंग्रजांनी जबर शिक्षा केली आहे. आता पुन्हा कुणी इंग्रजी सत्तेविरूद्ध आवाज उठवील का ?' असाच एकंदरीत चर्चेचा रोख दिसला. बापटांना अर्थातच हे विचार पटत नव्हते. त्यांनी त्यांची मते परखडपणे मांडली. त्या वेळी कॉलेजमध्ये इतिहास विषय शिकवायला युरोपियन प्राध्यापक होते. इंग्रजच असल्यामुळे इंग्रजी राजवटीबद्दल त्यांना विलक्षण अभिमान. इंग्रजांच्या अंगी कोणते गुण आहेत, राज्य करायला ते कसे लायक आहेत, हे तर ते नेहमीच विद्यार्थ्यांना सांगायचे. १८५७ च्या स्वातंत्र्य- युद्धाबाबत विद्यार्थ्यांत झालेल्या चर्चेचा सूर त्यांच्याही कानावर आला. पण त्यांनी विद्यार्थ्यांना परखडपणे सांगितले. ,

" It is our duty to punish, but your duty to revolt."

बापटांना आपले विचार चुकीचे नाहीत याची खात्री पटली. स्वातंत्र्यासाठी बंड करणे हे आमचे कर्तव्य आहे, हा विचार त्यांच्या मनात पक्का रुजला.

१९०३ मध्ये इतिहास आणि अर्थशास्त्र विषय घेऊन बापट बी. ए. ची परीक्षा द्वितीय श्रेणी मिळवून पास झाले. पुढे काय करायचे हे अजून निश्चित झालेले नसले, तरीही तूर्त एल्एल्.बी. चा अभ्यास सुरू करावा असे त्यांना

वाटले. पण घरची प्रापंचिक जबाबदारी थोडीफार अंगावर होती. पोटापुरते काही मिळवायला हवे म्हणून त्यांनी बारा रुपये पगाराची अर्धवेळ नोकरी पत्करली. व एल्.एल्. बी. ऐवजी एम्. ए. होण्यासाठी मुंबईच्या कॉलेजमध्ये नावही घातले.

पदवीदान-समारंभाच्या वेळी बापटांना त्यांच्या कॉलेजमध्ये पेंडसे नावाचे मित्र भेटले. थोडे इकडचे तिकडचे बोलणे झाल्यावर पुढे काय करणार, असे बापटांनी विचारताच शेठ मंगलदास यांच्याकडून शिष्यवृत्ती घेऊन मी इंग्लंडला शिकायला जाणार असे त्यांनी सांगितले. पेंडसें यांच्याकडून माहिती कळल्यानंतर बापटांनी **सुद्धा** या शिष्यवृत्तीसाठी अर्ज केला. आश्चर्य म्हणजे नंतर अर्ज करून सुद्धा बापटांना ही शिष्यवृत्ती मिळाली. हिंदू एज्युकेशन सोसायटीतून त्यांना काही मदत मिळाली. बापटांनी पदवी घेतली ती कला-शाखेची, पण ते विलायतला गेले ते मेकॅनिकल इंजिनियर होण्यासाठी. अर्थात् शिक्षण हे केवळ निमित्त होते हे निश्चित. खरा उद्देश होता शत्रूच्या गोटात जाऊन भारताबाहेर स्वातंत्र्यासाठी चालणाऱ्या क्रांतिकारक चळवळींशी संधान साधणे.

लंडनमध्ये महागाई फार असल्यामुळे, बापटांनी लवकरच तिथून मुक्काम हलवला आणि एडिंबरोला रहायला गेले. तिथे हिंदी लोकांची बरीच वस्ती होती. चौका-चौकात भरणाऱ्या मजूर-पक्षाच्या पुढाऱ्यांच्या सभांना ते आवर्जून उपस्थित रहात. इंजिनियरिंगचे शिक्षण चालू असतानाच थोड्या फार सामाजिक कामात भाग घ्यायला त्यांनी सुरुवात केली. ' Temporance Society ' म्हणजे 'माफक मद्यपान मंडळ ' या संस्थेचे ते सुरुवातीला सभासद व नंतर सेक्रेटरी झाले. त्यातूनच जॉन डिम्बॉल या मजूर-पक्षाच्या पुढाऱ्याची ओळख झाली. त्यांनी एक दिवस बापटांना हेमंत-व्याख्यानमालेत व्याख्यानासाठी निमंत्रण दिले. विषय होता ' British Rule in India '. व्याख्यानाचा विषय तर बापटांच्या आवडीचा होता. त्यांच्या मनातला अंतस्थ हेतू त्यामुळे साधणार होता. पण आपल्याला राजकारणातले फारसे कळत नाही, या विषयाचा फारसा अभ्यास नाही, आपण काय व्याख्यान देणार ? अशी शंका वाटू लागली. पण आलेली सुवर्णसंधी दवडायची नाही असे त्यांनी ठरवले. इंडिया हाउसमधील श्यामजी कृष्ण वर्मा हे स्वातंत्र्यासाठी प्रयत्न करणाऱ्या क्रांतिकारकांचे सहाय्यकर्ते. बापटांनी त्यांच्याकडून काही पुस्तके मागितली. त्यांतील दादाभाई नौरोजी यांच्या ' Poverty in India ' या पुस्तकाने ते विशेष प्रभावित झाले.

या पुस्तकाच्या वाचनाने त्यांच्या इंग्रजांबद्दलच्या भावना प्रक्षुब्ध झाल्या. रात्रंदिवस जागून, अभ्यास थोडा बाजूला ठेवून, त्यांनी व्याख्यानाची जोरदार तयारी केली.



बापटांनी पिस्तुल काढून टेबलावर आपटले !

एडिंबरो येथील शेफर्ड-सभागृहात बापटांचे हे व्याख्यान झाले. त्यांच्या मनातले प्रक्षोभक विचार त्यांनी जोरदारपणे मांडले. " इंग्रज राज्यकर्त्याला भारतातल्या जनतेची मुळीच पर्वा नाही. आम्हाला सतत गुलामगिरीत ठेवणारे शिक्षण देण्यात येत आहे. राज्यकर्ते तेवढे शहाणे व कर्तबगार, आणि आम्ही हिंदी लोक अडाणी व बावळट. पण लक्षात ठेवा, आमची तरुण पिढी आता शिकून शहाणी होत आहे. आम्हाला आता आमचे स्वत:चे सरकार हवे आहे. आणि आमच्या मायभूला मुक्त करायला आम्ही **कटिबद्ध** झालो आहोत." बापट नुसते व्याख्यान देऊन थांबले नाहीत. त्यांनी या व्याख्यानाच्या हजारो प्रती छापून

हिदुस्तानात पाठवल्या. बापटांच्या भाषणाचा सर्वत्र गवगवा झाला. अर्थात् याचा व्हायचा तोच परिणाम झाला. त्यांची शेठ मंगलदास-शिष्यवृत्ती बंद झाली. हिंदू एज्युकेशन सोसायटीची मदत बंद झाली. मुंबई विद्यापीठाने बापटांना कारणे दाखवा, तुमच्या वागणुकीचा खुलासा करावा अशी नोटीस बजावली. पण बापट डगमगले नाहीत. क्षमा मागण्याचे त्यांनी नाकारले. वीर सावरकर त्या वेळी इंग्लंडमध्ये होते. त्यांना या गोष्टीचा संताप आला.' विहारी ' पत्रात त्यांनी लिहिले, " देशाला स्वातंत्र्य मागण्याच्या अपराधाबद्दल बापटांची शिष्यवृत्ती बंद झाली, या घटनेचा मी निषेध करतो. देशाने सतत गुलामगिरीतच रहावे अशी तर अट मंगलदास शेठजींनी शिष्यवृत्ती देताना घातली नव्हती ना ? "

या घटनेमुळे अर्थातच बापटांच्या इंजिनियरिंगच्या शिक्षणाचा बोजवारा उडाला. लोकमान्यांच्या शिफारशीवरून ते इंडिया हाउसमध्ये राहायला आले. त्या ठिकाणी सावरकरांची आणि बापटांची चांगलीच मैत्री जमली. त्यांच्यासारखेच इतर अनेक तरुण क्रांतिकारक भेटले. पहिल्या व्याख्यानामुळे बापटांच्या नावाचा सर्वत्र गवगवा झाला, आणखी एका ठिकाणी त्यांना व्याख्यानासाठी निमंत्रण आले. विषय होता ' २००७ सालातील हिंदुस्तान ' हे व्याख्यान तर अधिकच प्रक्षोभक झाले. त्यात त्यांनी स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी शस्त्रबळाचा वापर आणि त्यासाठी करण्यात येणाऱ्या मनुष्यवधांचे समर्थन केले. भाषणाच्या शेवटी त्यांनी खिशातून एक भरलेले पिस्तुल काढले आणि ते अध्यक्षांच्या टेबलावर आपटून आम्ही **याचासुद्धा** वापर करणार आहोत, असे उघडपणे सुचवले. इतके प्रक्षोभक भाषण ऐकून सारी सभा भयचकित झाली. अध्यक्षांनी बापटांचे ते पिस्तुल जप्त केले आणि नंतर पोस्टाने परत केले. या सभेला तीन रशियन क्रांतिकारक तरुणी आल्या होत्या. त्यांतील ॲना खोस ही मेडिकल कॉलेजची विद्यार्थिनी. बापटांच्या नजरेतील तडफ पाहून ती प्रभावीत झाली. या धाडसाबद्दल तिने बापटांचे अभिनंदन केले.

या दोन व्याख्यानांच्या निमित्ताने बापटांमधील देशभक्तीची चुणूक दिसून आली. त्या काळात त्यांना देशभक्तीच्या वेडाने कसे पछाडले होते, हे त्यांनी लिहिलेल्या कवितेच्या पुढील ओळींवरून दिसून येते.

" देशाचा संसार माझे अंगावरी ।
ऐसे थोडे तरी वाटू द्या हो ।
वाटू द्या हो थोडे थोडे प्रत्येकासी ।
माझी कासाविसी याचसाठी ।
याचसाठी तुम्हा हात जोडतसे ।
कोणी म्हणतसे वेडा झाला ।
वेडा झाला देश माऊलीचेसाठी ।
होते पुण्य गाठी हेची खरे ।"

***

# बॉंब-विद्येचे रहस्य

" बापट, पिस्तुल हे आता फार जुनं अस्त्र झालं नाही ?"

" हो ना । अगदी खरे आहे. शिवाय या अस्त्राला मर्यादाच फार. एका वेळी जास्तीत जास्त एकाच माणसाचा बळी घेता येतो."

" इंग्रजांविरूद्ध जर लढायचं असेल तर त्यांच्यासारखी आधुनिक अस्त्रं आपल्याजवळ पण हवीत."

" मी तर म्हणतो आपल्याकडे बॉंब गोळे सुद्धा हवेत. या अस्त्राची जादू काही औरच आहे."

" आपल्याकडे जर असले अस्त्र असेल तर अशी धमाल उडवून देता येईल !"

" पण बॉंब-विद्येचे रहस्य आपल्याला कोण समजून सांगणार ?"

" बापट काही फ्रेंच आणि रशियन क्रांतिकारक तुमच्या ओळखीचे आहेत. हे काम तुम्हीच उत्तम प्रकारे करू शकाल."

इंडिया-हाउसच्या गच्चीवर काही भारतीय क्रांतिकारक एकत्र आले आणि त्यांच्यात अशी गुप्त खलबते चालू होती. शेवटी बापटांनी पॅरिसमध्ये जाऊन बॉंब-विद्या शिकून यावी असे ठरले.

बापटांनी अभ्यासाचा गाशा केव्हाच गुंडाळून टाकला होता. आता डोक्यात होते सशस्त्र क्रांतीचे वेड. पॅरिसमध्ये बॉंब-विद्या तयार करणारी एक प्रयोगशाळाच होती. तिथे बंगालमधील क्रांतिकारक हेमचंद्रदास, मिर्झा अब्बास यांची भेट झाली. त्यांच्याही डोक्यात ही नवीन अस्त्रविद्या शिकण्याचे होतेच. खूप खटपट करून त्यांना बॉब-विद्येची कृती असलेले ' Russian Bomb Manual ' नावाचे चोपडे मिळाले. पण ते होते रशियन-भाषेत. रशियन भाषा तर कुणालाच येत नव्हती. बापटांना आठवण झाली ॲना खोस नावाच्या रशियन मैत्रिणीची. त्यांनी महत् प्रयासाने तिचा ठावठिकाणा शोधून काढला. एडिंबरो येथील बापटांचे भाषण ऐकल्यापासून ॲनाला बापटांबद्दल खूप आदर वाटू लागला होता. तिची मेडिकलची परीक्षा जवळ आली होती. त्यामुळे ती देवस-रात्र अभ्यासात गढून गेली होती. अशा वेळी बापट तिच्याकडे ही महत्त्वाची कामगिरी घेऊन गेले.

" आपण मला ओळखलंत का ?"

" एवढ्या लवकर मी आपली ओळख कशी विसरेन ? तुमच्यासारख्या जहाल विचारांच्या तरुण क्रांतिकारकाबद्दल मला सदैव आदरच वाटतो."

" याची खात्री होती म्हणून तर मी तुमच्याकडे एक महत्त्वाची कामगिरी घेऊन आलो. तुम्हाला थोडा त्रास देणार आहे."

" त्यात त्रास कसला ? तुमच्या देशाच्या मुक्ततेत मलाही काही थोडा वाटा उचलता आला तर आनंदच वाटेल."

" काम अत्यंत जोखमीचे आहे. गुप्तता राखणे फार महत्त्वाचे आहे."

" मी ते जबाबदारीने पार पाडीन."

" मला एक बॉंब तयार करण्याची कृती असलेली चोपडी मिळाली आहे. पण ती आहे रशियन भाषेत. आम्हाला तर कुणालाच रशियन भाषा येत नाही."

" त्याचं इंग्रजीत भाषांतर करून हवंय ना ? हे काम तर मी आनंदानं करीन. पण कामाची फार घाई नाही ना ? सध्या माझ्या मेडिकलच्या परीक्षेचा अभ्यास चालू आहे."

" खरं तर खूपच घाई आहे. हे काम जितक्या लवकर होईल तितक्या लवकर पुढची सूत्रे हलवता येतील."

" ठीक आहे. परीक्षेचं काय करायचं ते नंतर पाहता येईल. आधी तुमची तातडीची वेळ भागवते. तुमच्या कामाचं महत्त्व मी जाणते."

" आपण परत कुठे भेटणार ?"

" पुढच्या आठवड्यात लंडनमध्ये भेटू या."

एक रशियन तरुणी. नुकतीच ओळख झालेली. पण बापटांनी तिच्यावर अशी काही मोहिनी घातली की, मेडिकलचे एक वर्ष तिने वाया घालवले व बापटांना त्या पुस्तिकेचे इंग्रजी भाषांतर करून दिले. पुढे ही तरुणी बापटांच्या प्रेमात पडली. तिने त्यांना विवाहाबद्दलही विचारले. मोठा नाजूक प्रश्न होता. पण बापटांनी तिची समजूत घातली.

" तुझ्याशी विवाह करायला आवडलं असतं पण माझ्या आयुष्यात तू फार उशीरा आलीस. माझे या पूर्वीच लग्न झाले आहे."

" काही हरकत नाही. मला हे माहीत नव्हते. पण आपली मैत्री तर अशीच राहील."

बापटांनी भाषांतरित हस्तलिखिताच्या वीस प्रती तयार केल्या. काही प्रती भारतात पाठविल्या. एक प्रत लोकमान्य टिळकांकडे पाठविण्यात आली. पण केवळ पुस्तिका हस्तगत करून त्यांचे समाधान होत नव्हते. प्रत्यक्ष कृती करून पहायला बापट उत्सुक होते. इंडिया-हाउसच्या गच्चीवर बॉंब तयार करण्याची प्रयोगशाळाच उभारण्यात आली. वीर सावरकर सुद्धा तिथेच होते. त्यांनाही या प्रयोगाबद्दल औत्सुक्य होते. बॉंब तयार करण्यात आला. इंडिया-हाउसच्या मागच्या बाजूच्या रिकाम्या जागेत स्वतःच्या हाताने बापटांनी बॉंब टाकला. धडाड् धुडुम ! केवढा तरी मोठा आवाज झाला. प्रचंड धूर आणि प्रकाशवलये पसरली. या अस्त्राचा प्रभाव पाहून या दोघांचेही डोळे दिपून गेले. बापट तर अगदी भारावून गेले. त्यांच्या डोक्यात एक भयंकर विचार येऊन गेला.

" सावरकर माझ्या डोक्यात एक क्रांतिकारक कल्पना आली आहे. इथल्या पार्लमेंट-हाउसवर बॉंब टाकून एकच गोंधळ उडवून देऊ."

" छे छे बापट ! अहो, असे करणे तर अविचाराचे होईल. असे नुसते एखादे सनसनाटी कृत्य करून काय साधणार ?"

" पण मला तर आता स्वस्थ बसवत नाही."

" माझे थोडे ऐका. असले भलते धाडस करू नका. आता कुठे आपल्याला ही नवीन अस्त्रविद्या अवगत झाली आहे. आपण जर आत्ताच पोलिसांच्या तावडीत सापडलो तर ही बॉंबची जादू आपल्याबरोबरच संपून जाईल."

" पण मग मी काय करू ?"

" मी सांगतो तसं करा. मनाच्या अशा प्रक्षोभक अवस्थेत तुम्ही इथे राहणे फार धोक्याचे आहे. भारतात परत जाऊन तुम्ही क्रांतिकारकांमध्ये या विद्येचा प्रसार करा. त्याने आपल्या मनातला हेतू साधणार आहे."

सावरकरांच्या विचारातील पोक्तपणा बापटांना जाणवला. उतावळेपणा करून कार्यनाश होईल हे त्यांना पूर्णपणे पटले व ते भारतात परत येण्यासाठी निघाले. बापट लंडनमधून निघाले आहेत, ही बातमी कुठून तरी फुटली. इंग्रजांचा बापटांच्यावर डोळा होताच. त्यांना पकडण्यासाठी इंग्रज अधिकाऱ्यांनी मुंबई बंदरात जय्यत तयारी केली होती. पण बापटांनी बोटीने प्रवास करत असतानाच स्वतःचे नाव बदलले. संस्कृत शिकवणाऱ्या एका गरीब भटजीबुवांचे त्यांनी सोंग आणले. लंडनवरून येताना बापटांनी बॉंब-विद्येच्या पुस्तिकेच्या प्रती, प्रयोगासाठी आवश्यक ती रसायने आणि स्फोटक द्रव्ये बरोबर आणली. दोन पिस्तुले तर त्यांच्या बुटातच होती.

मुंबई बंदरावर उतरताच कस्टम-अधिकारी तपासणीसाठी पुढे झाले. तोंडाने भगवद्‌गीतेचे श्लोक गुणगुणतच ते बोटीवरून उतरले. कारण आता ते क्रांतिकारक बापट नव्हते.

" आपले नाव ?"

" चिदंबर दत्तात्रय जोशी."

" परदेशात कशासाठी गेला होतात ?"

" कशासाठी म्हणजे ? संस्कृत शिकवण्यासाठी. तिथल्या एका व्यापाऱ्याने मला यासाठी मुद्दाम बोलावले होते. खरं म्हणजे माझ्या या पोशाखावरूनच तुमच्या लक्षात यायला हवे."

" आपलं सामान तपासायचं आहे ?"

" अहो, माझं सामान कशासाठी तपासता ? मी काय तुम्हाला क्रांतिकारव वगैरे वाटलो काय ? माझ्यासारख्या गरीब ब्राह्मणाच्या सामानात संस्कृत पोथ्यांशिवाय तुम्हाला दुसरं काय मिळणार ?

" पण आम्हाला हे सारे सोपस्कार करावेच लागतात. हल्ली कोणाचाही भरवसा वाटेनासा झाला आहे."

" तुम्हाला संशय-पिशाच्च्याने पछाडलेलं दिसतंय. आता तुमचा एवढाच आग्रह असेल तर या किल्ल्या घ्या अन् तपासा माझं सामान."

अस म्हणत बापटांनी किल्ल्या त्या कस्टम-अधिकाऱ्याकडे फेकल्या. हे एक प्रकारचे धक्कातंत्र असले, तरी अखेरीस हा जुगारच. बापटांच्या सुदैवाने त्या कस्टम अधिकाऱ्याला वाटले असावे, " हा माणूस इतक्या आत्मविश्वासाने किल्ल्या देतो आहे. याच्याकडे काय असणार ? आणि बापटांचे सामान न तपासताच त्यांची बिनबोभाट सुटका झाली.

बापटांच्या मातापित्यांनी आपला मुलगा आता विलायतेहून इंजिनियर होऊन येईल, अशी सुखस्वप्ने रंगवली होती. पण प्रत्यक्षात मुलगा आला तो डोक्यात क्रांतीचे वेड घेऊन.

***

# रोमहर्षक अज्ञातवास

बापट भारतात आले तरी, घरातल्यांना लगेच भेटण्याच्या आधी परस्पर कलकत्त्याला माणिकतोळा या बंगाली क्रांतिकारकांच्या निवासस्थानी गेले. त्या ठिकाणी बॉंब तयार करणारी प्रयोगशाळा या आधीच उभी राहिली होती. बापटांच्या मनात देशभर बॉंब-विद्येचा प्रसार करायचा, ठिकठिकाणी बॉंबचे साठे करायचे व सर्व बाजूंनी एकदम उठाव करायचा असे होते. पण बंगालमधील क्रांतिकारक उतावळ्या स्वभावाचे होते. किरकोळ कारणांसाठी एखाद-दुसऱ्या अधिकाऱ्याला मारण्यासाठी त्यांनी बॉंबचा उपयोग करायला सुरुवात केली. या क्रांतिकारकांची समजूत घालण्यात बापट अपयशी ठरले. अखेर क्रांतिकारकांशी मतभेद झाल्यामुळे बापटांनी कलकत्ता सोडले.

बापटांचे मनस्वास्थ्य पार बिघडून गेले. त्यांना प्रवासात असतानाच खूप ताप भरला. विश्रांतीसाठी ते काही दिवस मित्राकडे राहिले व थोडे बरे वाटल्यावर पारनेरला आले. मुलाची अवस्था पाहून दादा तर चिंताग्रस्त झाले. त्याने थोडे संसारात लक्ष घालावे म्हणून गद्रे-वाड्यात स्वतंत्र बिऱ्हाड थाटून दिले. बापट पारनेरला आल्यावर **सुद्धा** काही दिवस आजारीच होते. त्यांच्या पत्नीची-रुख्मिणीची अवस्था अत्यंत केविलवाणीच होती. विवाह झाला तरी तिला पतीचा सहवास पुरेसा मिळालाच नाही. एकीकडे खूप दिवसांनी नवरा परत आला म्हणून, आता तरी आपला संसार नीट चालेल अशी भाबडी आशा. दुसरीकडे देशासाठी फार मोठे काम होत असल्याबद्दल पतीबद्दल वाटणारा

**अभिमान,** पण त्याचबरोबर अशा अवस्थेत संसार होणार कसा ? ही सतत वाटणारी काळजी, अशी त्यांच्या मनाची द्विधा अवस्था झाली.

दादांनी एक महिन्याच्या खर्चासाठी पुरतील एवढेच पैसे दिले होते. पुढे तुझा तू तुझ्या पायावर उभा रहा असे निक्षून सांगितले होते. बापट केसरी-कार्यालय, ज्ञानप्रकाश आणि काही मित्राकडे जाऊन परत यायचे. लोकमान्यांची आणि त्यांची केसरी-कार्यालयात भेट झाली. आपल्या मनातील बेत बापटांनी ऐकवले. लोकमान्यांनी त्यांना सबुरीचा सल्ला दिला, " आपण सिंहगडावर निवांतपणे भेटू व पुढे काय करायचे ते ठरवू. तो पर्यंत काही गडबड करू नका." असे त्यांनी सांगितले. पण ही निवात भेट झालीच नाही. लोकमान्यांची सहा वर्षाच्या कारावासासाठी मंडालेला रवानगी झाली. इकडे बंगालमधल्या क्रांतिकारकांच्या स्फोटक चळवळीच्या बातम्या सतत येत होत्या. खुदीराम बोसने किंगफोर्डला मारण्यासाठी पहिला बॉंबस्फोट केला. आणखी एका ठिकाणी केलेल्या बॉंबस्फोटात काही निरपराध इंग्रज नागरिक मारले. त्यात स्त्रिया व मुलांचाही समावेश होता. या बातम्या ऐकून बापट फार अस्वस्थ झाले. आणि एक दिवस बापट विश्रामबागवाड्यावरून जात असताना त्यांच्या मित्राने ' ज्ञानप्रकाश ' चा अंक वाचायला दिला. त्यात ' नरेंद्र गोस्वामीची मुक्ताफळे ' अशा मथळ्याच्या बातमीने त्यांचे लक्ष वेधले. माणिकतोळा-बॉंबस्फोट-प्रकरणातील माफीचा साक्षीदार नरेंद्र गोस्वामी हा उलटला होता. ' बापटांनी बॉंब-विद्या भारतात आणली ' असा त्याने गौप्यस्फोट केला. बापटांना पुढचे भवितव्य स्पष्ट दिसत होते. आपण आता पकडले जाणार, याची भीती तर होतीच. एक दोन दिवस देवभानकर या मित्राकडे राहून त्याच्याशी सविस्तर चर्चा करून, बापट त्याच दिवशी वेषांतर करून, भूमिगत झाले. २५ जून १९०८ या दिवसापासून बापटांच्या अज्ञातवासाला सुरुवात झाली.

इकडे रुक्मिणीला झाल्या प्रकाराची काहीच माहिती नव्हती. दुपारी १२ वाजले, २ वाजले, तरी बापटांचा पत्ता नाही. पतीची वाट पहात त्या न जेवता तशाच थांबून राहिल्या. रात्र झाली तरी बापटांचा पत्ता नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी सकाळी दरवाजावर थाप पडली. पती आला अशा समजुतीने तिने दार उघडले, तर दारात पोलीस हजर.

" बापट कुठे आहेत ? त्यांचा ठावठिकाणा सांगा. आम्ही त्यांना अटक करायला आलो आहोत."

हे पाहिल्यावर त्या मनस्विनीचा संताप झाला.

" अहो तुम्हाला काही माणुसकी आहे की नाही ? कालपासून मी त्यांचीच वाट पहात आहे. मला त्यांच्याबद्दल काहीही माहीत नाही. खबरदार पुन्हा या घरात पाऊल टाकाल तर ! "

हा रुद्रावतार पाहिल्यावर पोलीस-अधिकारी चपापले. आणि थोडा वेळ आसपास घुटमळून ते तिथून निघून गेले.

इकडे बापटांचे काय झाले ? विष्णू विनायक मुळे हे नाव धारण करून औरंगाबादला जयराम बापू ताम्हणे यांच्या घरी त्यांनी काही दिवस आचाऱ्याचे काम केले. बापटांच्या अंगी असलेले पाककलेचे कसब इथे उपयोगी पडले. हा आचारी मुका आणि बहिरा होता. ' केसरी ' मात्र अगदी बारकाईने वाचायचा. सात-आठ महिने हे आचाऱ्याचे सोंग छानपैकी वठले. तिथे जेवायला अनेक वकील येत. निरनिराळ्या खटल्यांच्या हकीकती ऐकायला मिळत. वरकरणी बहिरेपणाचे सोंग, पण प्रत्यक्षात शब्द न शब्द मनात साठवला जातोय. अशीच एका खटल्याबाबत वकिलांत चर्चा चालू होती. खटला जिंकण्यासाठी कोणते मुद्दे मांडावेत याचा खल चालू होता. बापटांनी खाणाखुणा करून काही शब्द पाटीवर लिहून दाखवून खटला कसा चालवावा हे सूचित केले.

काही दिवसांनी हे वकील महाशय घरमालकाकडे आले. " तुमच्याकडचा तो आचारी भलताच हुशार दिसतो. अहो, त्यांनी दिलेल्या मुद्द्यांप्रमाणे मी खटला चालवला आणि निकाल आमच्या बाजूने लागला. त्यां आचाऱ्याला मला काही बक्षीस द्यायचे आहे. तो आहे कुठे ?" अशी त्यांनी चौकशी केली. पण पोलिसांना संशय येण्याच्या आधीच मुळे आचारी झाला गायब. आता पुरुषोत्तम सखाराम वैद्य हे नाव धारण करून ते झाले शेतकरी. अज्ञातवासात आपण कोणकोणती सोंगे वठवली हे त्यांनी काव्यमय आत्मचरित्रात लिहून ठेवले आहे. ते म्हणतात.

" जाहलो बल्लव कोठे । कुठे कृषक जाहलो ।
अध्यापकही झालो मी । सातवी शिकलो पुन्हा । "

इंदूर संस्थानात एका मित्राच्या ओळखीने शेतजमीन खरेदी केली. मुक्काम कुठे करणार ? जवळच एका भिल्लाची झोपडी रिकामी होती. तिथेच राहायला गेले. आजूबाजूच्या लोकांनी त्यांना सावध केले,

" आहो तिथे राहायला जाऊ नका ."

" का ? "

" अहो ती भुताची झोपडी आहे. "

" मग तर छानच झालं, तेवढीच भुताची सोबत होईल. "

" आणि भुतानं झपाटलं तर ? "

" माझ्या वाटेला नाही ते भूत जाणार !"

" आमचं ऐका जरा. त्या भुताच्या झोपडीत राहण्यापेक्षा सरळ शंकराच्या देवळात जाऊन का राहात नाही ?"

बापटांनी गावकऱ्यांचे म्हणणे मानले. पण हे शेतकऱ्याचे सोंग फार दिवस टिकले नाही. नाव पुरुषोत्तम वैद्यच. पण काही दिवस कंपोझिटर होऊन ट्रेडल मशिनवर कंपोझिंगचे काम. धारला असताना काही दिवस शिक्षक म्हणून काम केले. प्राथमिक शिक्षक होण्यासाठी कमीत कमी सातवीची परीक्षा पास हवी. बापट तर होते बी. ए. पण ते पांडुरंग बापट या नावाने. पुरुषोत्तम वैद्य या नावाने पुन्हा एकदा सातवीच्या परीक्षेला बसले व चांगल्या मार्कांनी पास झाले. ते शिक्षक म्हणून काम करत असतानाच त्यांना एक मानसकन्या लाभली. तिला शाळेत अभ्यास फारसा आवडत नसे. पण वैद्यमामांच्याजवळ शिकायला मात्र आवडायचे. ते तिला एखादी गोष्ट सांगत व निम्मी सांगून झाली की आता पुढची या पुस्तकातून वाच असे सांगत. त्यामुळे तर तिला वाचनाची गोडी लागली. कधी फिरायला जाताना ते या मुलीला आसपासच्या झाडांची, फुलांची आणि निरनिराळ्या प्रकारच्या दगडांची माहिती सांगत. कधी आकाशातल्या ग्रहताऱ्यांची माहिती मिळायची. कधी तोंडी हिशोब तर कधी परवाचा. या अशा हसत-खेळत शिकण्याच्या पद्धतीमुळे त्या मुलीला वैद्यमामांचा खूप लळा लागला. ही बापटांची मानसकन्या म्हणजेच नगरचे वकील नानासाहेब सप्तर्षी

यांच्या पत्नी सुशीलाबाई सप्तर्षी. पुढे वर्षानुवर्षे हे जिव्हाळ्याचे नाते टिकून राहिले.

पोलीस सतत पाळतीवर असायचे, त्यामुळे एका पेशात आणि एका नावाने फार दिवस राहणे धोक्याचेच होते. मथुरा, वृंदावन इथे काही दिवस होते. काही दिवस काशी क्षेत्री जाऊन जगन्नाथशास्त्री बनून कौमुदी शिकायला सुरुवात केली. इतके झटपट वेष आणि पेशा बदलणे बापटांना कसे जमत होते, हे त्यांचे त्यांनाच माहीत. अज्ञातवासात असतानाच एका विचित्र प्रसंगातून त्यांना जावे लागले. पोलीस-पार्टी पाठलागावर होती. त्यांचा पाठलाग चुकवत लपत-छपत बापट पळत होते. रात्रीची वेळ. पळता पळता एका लहानशा घरात ते आश्रयासाठी थांबले. पोलिसांनी घरात येऊ नये, म्हणून दार लावून घेतले. पण मग त्यांच्या लक्षात आले, ते एका वेश्येचे घर होते. अचानकपणे आणि अशा अवेळी परपुरुषाला एकदम घरात शिरताना पाहून ती वेश्या सुद्धा हबकलीच. बापटांच्या सर्व प्रकार लक्षात आला. चटकन् ते पुढे झाले. हात जोडून त्यांनी तिची विनवणी केली, " बाई गं, माझ्याबद्दल गैरसमज करून घेऊ नकोस. मी एक क्रांतिकारक आहे. पोलिसांचा पहारा चुकवत मी या घरात शिरलो. काहीही करून मला तुझ्या घरात कुठे तरी लपव." ती बाई थोड्या विचारात पडली. मग तिला चटकन् एक युक्ती सुचली.

" काय रे बाबा, तू माझा घरगडी बनून राहशील का ?"

" हो आनंदाने. कुठून तरी मला पोलिसांना हुलकावणी द्यायची आहे."

" ठीक आहे. आत जाऊन पोषाख बदल. पोलीस आले तर काय करायचे ते मी बघते."

थोड्याच वेळात दारावर पोलिसांच्या थापा पडल्या. दार उघडताच पोलीस आत शिरले.

" बाई, तुमच्या घरात एका क्रांतिकारकाला शिरताना आम्ही पाहिले."

" माझ्या घरात ? आणि ते कशाला ?"

" आम्हाला जास्त बोलायला वेळ नाही. मुकाट्यानं आम्हाला त्या माणसाला कुठे लपवलंय सांग ?"

" तुम्ही काय बोलताय मला काहीच कळत नाही."

" घरात कोण कोण आहे तुझ्या ?"

" मी अशी एकटी आणि माझ्या सोबतीला आमचा घरगडी."

' घरगडी कुठे आहे ?"

" बोलावते की ! अरे दत्तू साहेब आलेत. त्यांच्यासाठी चहा घेऊन ये."


आणि थोड्याच वेळात अर्धी चड्डी, खांद्यावर फडके, हातात चहाच्या कपबशा अशा थाटात दत्तू हजर.

" चहा घ्या साहेब. साहेब ही बाई फार गरीब आहे. हिला कशाला त्रास देताय ?"

पोलिसांनी घरगड्याकडे नीट निरखून पाहिले. बापटांनी सोंग असे बेमालूम वठवले होते की, संशयाला कुठे जागाच नव्हती. पण तरीही पोलिसांनी घराची कसून झडती घेतली. घराचा कोपरान् कोपरा धुंडाळला पण हाती काही लागले नाही. त्या बाईला खूप दमदाटी केली. ती माहिती सांगत नाही म्हटल्यावर तिला मारहाण केली. हे सारे पहात असताना बापटांच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. शेवटपर्यंत या बाईने बापटांबद्दल काही सांगितले नाही. सामान्य माणसातली ही देशप्रेमाची भावना पाहून, बापटांचे मन आनंदाने भरून आले. पोलीस कंटाळून निघून गेले. बापटांनी पटकन् पुढे होऊन त्या बाईचे पाय धरले आणि म्हणाले,

" जगाच्या दृष्टीने तुम्ही कुणीही असा. पण माझ्या लेखी तुम्ही माउलीच आहात. आज तुमच्यामुळेच मी वाचलो."

" छे ! त्यात काय एवढं. आयुष्यभर मी पापच करत आले. तेवढेच थोडे पुण्य जोडता आले."




**अज्ञातवासाच्या काळात बापटांनी अनेक रूपे धारण केली.**

पांडवांचा अज्ञातवास एकच वर्षाचा होता. पण बापटांना साडेचार वर्षे अज्ञातवासात काढावी लागली. अखेरीस फितुरीने डाव साधला. त्यांच्याशी मैत्रीने वागणाऱ्या एका गृहस्थाने त्यांना काशीहून इंदूरला बोलावून घेतले. तो गुप्तहेर आहे हे बापटांच्या नंतर लक्षात आले. या विश्वासघातामुळे बापट पोलिसांच्या तावडीत सापडले. मुंबईमध्ये पोलीस-कमिशनरच्या ऑफिसात त्यांची चौकशी सुरू झाली.

" आम्ही तुला सोडायला तयार आहोत. पण तुला कोणीकोणी मदत केली त्यांची नावे सांग."

" ते कदापीही शक्य नाही. माझा कितीही छळ केलात तरी मी नाव सांगणार नाही. ही माणसे अगदी सामान्य थरांतली आहेत. त्यांनी सर्व प्रकारचा धोका पत्करून मला आश्रय दिला. या माणसांची मी नावे सांगून विश्वासघात करणार नाही."

बापटांच्या शब्दाशब्दांतून इतका पक्का निर्धार व्यक्त होत होता की, मारहाण करून काही उपयोग नाही, हे पोलिसांच्या लक्षात आले. मग थोडा जामीन भरून बापटांची सुटका झाली. पुढे काही दिवस ते पारनेरला पोलिसांच्या नजरकैदेत होते.

साडेचार वर्षांच्या रोमहर्षक अज्ञातवासाची हकीकत वाचत असताना 'चमत्कारमयी माझी कहाणी मज वाटते ' या त्यांच्याच आत्मचरित्रातील ओळीचा प्रत्यय येतो.

***

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
क्र. क्र. 2868 दिनांक .....
विषय .... क्र. ......

# सुटका झाली, पुढे काय ?

साडेचार वर्षांच्या अज्ञातवासानंतर बापट पारनेरला परत आले. पण त्यांच्या प्रत्येक हालचालीवर सरकारची बारीक नजर होती. त्यांच्यावर लक्ष ठेवण्यासाठी सय्यद नावाचा एक सरकारी पाहुणा ठेवण्यात आला. काही दिवस तो त्यांच्या घरात रहात होता. पण पुढे पुढे हा सय्यद सरकारने आपल्याला काय कामाकरता नेमलंय हे विसरून बापटांच्या कुटुंबियांतला होऊन गेला. सरकारची सक्त नजर असल्यामुळे आता क्रांतिकारकांशी संबंध ठेवणे शक्यच नव्हते.

घरापासून खूप दूर राहिल्यामुळे बापट मनाने खूप हळवे झाले होते. विशेषत: आपल्या पत्नीची काय फरफट होत असेल हे त्यांना तीव्रतेने जाणवले. अज्ञातवासात असताना, आपण आपल्या पत्नीवर अन्याय करत आहोत, ही बोच त्यांना अस्वस्थ करीत होती. एके दिवशी त्यांनी पत्नीच्या नावे पत्र लिहिले, "माझ्याकडून संसाराची जबाबदारी पार पाडली जाईल असे वाटत नाही. तू अजून तरुण आहेस. संसारसुखाची तुझी कोणतीच इच्छा मी पुरी करू शकलो नाही. तुझे आयुष्य असे वाया घालवू नकोस. मी तुला विवाहबंधनातून मोकळे करंत आहे. माझा एक तरुण मित्र आहे. स्वभावाने खूप चांगला आहे. त्याच्याशी पुनर्विवाह करून सुखी हो, मित्राच्या संसारात तू सुखी झालेली पाहण्यात मला आनंद आहे." स्वत:च्या हातून झालेल्या चुकीचे हे एक प्रकारे परिमार्जन, पण किती लोकविलक्षण ? वटसावित्री नुकतीच होऊन गेलेली. ' हाच पती मला जन्मोजन्मी मिळावा ' म्हणून रुक्मिणीने प्रार्थना केलेली. आणि आता हे असे पत्र. पण बापटांचा मित्र फार मोठ्या मनाचा. बापटांच्या मनातल्या व्यथा तो जाणत

होता. त्याने रुक्मिणीबाईंची समजूत घालून पतीवरील असलेल्या त्यांच्या निष्ठेचे कौतुकच केले. आता अज्ञातवासातून सुटका झाल्यावर बापटांनी थोडेफार संसारात लक्ष घालायला सुरुवात केली.

प्रश्न मोठा विचित्र होता. देशसेवेची प्रतिज्ञा घेतलेली. राजकारण तर जवळजवळ वर्ज्य. क्रांतिकारकांशी संबंध ठेवायचा नाही. मग आयुष्यात पुढे करायचे काय ? पण एके दिवशी स्फूर्तीच्या दिव्य क्षणी, बापटांना पुढील कामाची दिशा सुचली. मनात विचार आला की, त्याप्रमाणे लगेच कामाला सुरुवात, हा तर बापटांचा खाक्या. एक दिवस ते सकाळी उठले. हातामध्ये फावडे, केरसुणी आणि टोपली घेऊन पारनेर गावातील गल्ल्याबोळ स्वच्छ करायला त्यांनी सुरुवात केली. या स्वच्छता-कामात सुरुवातीला घरातील तीनच माणसे, स्वतः बापट, त्यांचे धाकटे बंधू नारायण आणि मेहुणे दत्तोपंत भावे. गावातले लोक बापटांना तात्या म्हणून ओळखत. गावात कुजबूज सुरू झाली. काही जणांनी तर उघड उघड विचारले, " तात्या हे कसलं काम काढलं ? "




झाडूचे लालित्य

" स्वच्छतेचं. "

" पण तुमच्यासारख्या शिकल्या-सवरलेल्यांनी हे असलं वंगाळ काम करणं बर दिसत नाही. "

" पण सफाईच्या कामात वाईट काय आहे ?

" पण असलं हलकं काम !"

" जगामध्ये कोणतेही कामं हलकं नाही. चला तुम्हीही आमच्याबरोबर सफाई-मोहिमेत सामील व्हा. हा घ्या झाडू."

तात्यांनी हातात झाडू दिला की, गावकरी मंडळींची तोंडं आपोआप बंद होत. या माणसांशी वाद घातला तर आपल्या हातात झाडू येईल, हे त्यांना कळून चुकलं होतं. आपलं म्हणणं तात्या ऐकत नाहीत म्हटल्यावर गावकऱ्यांनी दादांची भेट घेतली.

" दादा तुम्हीच काहीतरी तात्याला समजावून सांगा. आपण असली हलकी कामे केली तर गावात आपली प्रतिष्ठा काय राहिली ?"

" दादा, सगळं गाव तुमच्या तोंडात शेण घालील."

" तुमचं म्हणणं खरं आहे. मी घालतो तात्याची समजूत."

आणि एक दिवस दादांचा आणि तात्यांचा वाद झाला.

" अरे तात्या, तू विलायतेहून शिकून आलास आणि आता हे काय आरंभलस !"

" काय झालं दादा ? माझं काही चुकलं का ?"

" तुझ्याबद्दल ऐकायला येतंय ते सारं विचित्रच. इतके दिवस सशस्त्र क्रांतीचं वेड डोक्यात होतं. त्यासाठी तू बॉंबविद्या शिकून घेतलीस. आता बघावं तर हातात झाडू घेऊन सफाईला सुरुवात केलीस. आयुष्यात काय करायचं हे तू ठरवयलंस का नाही ?"

" निश्चित ठरवलंय. सारं आयुष्य देशसेवेसाठी घालवायचं अशी मी प्रतिज्ञा करून बसलो आहे. बॉंबविद्या शिकून घेतली ती एक देशसेवाच होती. आणि आता या दुसऱ्या हातात झाडू घेतला, तोही देशसेवेचाच एक भाग म्हणून ".

" सफाई करण्यात कसली देशसेवा ?"

" दादा तुम्ही रोज देवाची पूजा करता. पूजा करण्याआधी देवाची बैठक झाडून स्वच्छ करता ना ? मग देश हाच माझा देव. मी माझ्या देवाची बैठक झाडून स्वच्छ करतो.

तुम्ही पूजक देवाचे । देशाचा मीही पूजक ।
सर्वव्यापी देव माझा । त्याची मी झाडी बैठक ।

यावर दादा तरी काय बोलणार ? एकीकडे गावकऱ्यांची बोलणी ऐकून घ्यायची, पण दुसरीकडे तात्यांचंही म्हणणं दादांना हळूहळू पटू लागलं. कुणी गावकरी तक्रार घेऊन आले की, ते त्यांना समजून सांगायचे,

" लहानपणी आई आपल्या बाळाची घाण स्वच्छ करते, तिला त्यात कुठे कमीपणा वाटतो का ? मग आपण तरी सफाईचं काम हलकं का मानावं ?"

या साऱ्या प्रकारात रुक्मिणीबाईंना काय वाटत होतं ? सुरुवातीला आपल्या पतीनं हे काय खूळ डोक्यात घेतलंय, हा विचार त्यांच्याही मनात आला असणार, पण हळूहळू तिलाही या कामाचे महत्त्व पटू लागले. आणि एक दिवस तिनं आपणहून विषय काढला,

" ऐकलं का ! उद्यापासून आता मी पण तुमच्याबरोबर गावाची सफाई करायला येणार."

" कशाला ? तू घरातली सफाई किती छान करतेस. मग मला थोडी बाहेरची सफाई करू दे. तुझ्यावर ही आणखी ज्यादा जबाबदारी कशाला ?"

बापटांचा दिनक्रम ठरलेला. पहाटे लवकर उठायचे. प्रार्थना आणि शौच-मुखमार्जन झाले की, हातात झाडू घेऊन सफाईला सुरुवात. गावातल्या लोकांनी सुरुवातीला थोडी टिंगल-टवाळी असा प्रकार केला.

" अरे तो बुड्ढा आज सफाईला आला नाही का ?" असे नगरपालिकेचा झाडूवाला सुद्धा विचारायचा. लोक मुर्दाडपणे हे सफाई-काम पहात. सफाई करणे त्या मानाने फार सोपे होते. पण लोकांच्या वृत्तीत बदल घडवून आणणे हे काठीणच. पण बापटांनी हे सफाईचे व्रत अबोलपणे आयुष्यभर राबवले. याचा नकळत परिणाम होत गेला. लोकांच्या वृत्तीतही हळूहळू बदल होत गेला.

त्या वेळची तात्यांची दिनचर्या कशी होती, हे पाहण्यासारखे आहे. सकाळी साडेपाच ते साडेसहा असा तासभर सफाईचा कार्यक्रम चाले. घरी आल्यावर सफाईचे सारे साहित्य धुवून स्वच्छ करायचे. गार पाण्याने स्नान झाल्यावर मग १०८ नमस्कार १५० बैठका असा व्यायाम. वयाच्या ७५ व्या वर्षापर्यंत सकाळची सफाई आणि व्यायाम या गोष्टी नित्यनियमाने संभाळल्या. सकाळच्या नाष्ट्याला दूध आणि बाजरीची भाकरी किंवा कणकेचा गाकर आणि झुणका एवढे असले की पुरायचे. वर्तमानपत्राचे थोडावेळ वाचन झाले की, ओटीवर ब्राह्मण, मराठा, महार, मांग, कुणबी, मुसलमान अशी सर्व प्रकारची मुले जमत. पाढे, कविता, लेखन, वाचन, कधी गोष्टी, असा तासदीडतासाचा कार्यक्रम असे. जेवणानंतर थोडी वामकुक्षी झाली की, दुपारी तीन वाजता काही मुले इंग्रजी शिकायला येत. दुपारी पाच वाजता गावातल्या दादा वाणी यांच्या दुकानाच्या समोरील दगडावर बसून प्रौढांसमोर तात्या ज्ञानेश्वरीतील काही ओव्या घेऊन त्यावर प्रवचन क़रीत. घरी आल्यावर पत्नीला दासबोध वाचून दाखवून त्याचा अर्थ सांगणे आणि रात्री जेवण झाल्यावर महारवाड्यात जाऊन तेथील मुलांना शिकवणे. तात्यांना शत्रूविरूद्ध हातात शस्त्र घेऊन लढण्याइतकेच या प्रकारचे विधायक कामही मोलाचे वाटत होते. त्यातूनच त्यांचे विशिष्ट प्रकारचे व्यक्तिमत्त्व घडत गेले.

बरेच दिवसांनंतर पतीचा नियमितपणे सहवास मिळू लागल्यामुळे रुक्मिणीबाई मनोमन सुखावल्या. त्यांची कूस उजवली. मुलगा झाला. तात्यांचे गावकऱ्यांशी इतके जिव्हाळ्याचे नातेगोते की, मुलगा झाल्याचा आनंद साऱ्या पारनेर गावाला झाला. थाटामाटात बारसे झाले. सनई, ताशा, वाजंत्री असा सारा थाटमाट होता. मुलाचे नाव वामन ठेवले. जेवणासाठी कोणताही भेदभाव न करता, सर्व जाती-जमातींची माणसे मांडीला मांडी लावून एकाच पंगतीत जेवली.

" सर्वांना ताजे अन्न द्या. उष्ट्या पत्रावळीतील अन्न कुणालाही द्यायचे नाही." असे तात्यांनी बजावून ठेवले. तात्यांचा स्वभाव आणि त्यांचे सामाजिक कार्य यांची रुख्मिंणीबाईंवर छाप पडली. त्यांनी तर तात्यांच्या पुढे एक पाऊल टाकले आणि बारशाचा आलेला सर्व आहेर महार, कुणबी आणि भंगी यांना वाटून टाकला.

तात्या थोडे फार संसारात रमले. काही थोडे विधायक कार्यही सुरू झाले. पण तरीही त्यांचे मन आतून कुठेतरी अतृप्तच होते. अज्ञातवासातून सुटका झाली, पण पुढे काय ? या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर अजून त्यांना सापडायचे होते.

***

बाल वाङ्मय विभाग
क्र. २८०६ दिनांक
विषय क्र.

# लोकमान्यांच्या सहवासात

बापटांचा अज्ञातवास सुरू होण्यापूर्वी लोकमान्यांबरोबर सिंहगडावर भेट होणार होती. पण तो योग हुकला. लोकमान्यांना अटक झाली. आणि ते सहा वर्षांच्या कारावासासाठी मंडालेला गेले. लोकमान्य हे तर अनेक क्रांतिकारकांचे स्फूर्तिस्थान. ते स्वत: जहाल मतवादी होते. पण तरीही क्रांतिकारकांचा उतावळेपणा त्यांना मान्य नव्हता. चार-दोन इंग्रज अधिकाऱ्यांना गोळ्या घालून किंवा मूठभर क्रांतिकारकांनी सशस्त्र उठाव करून देशाला स्वातंत्र्य मिळेल अशा भ्रमात ते कधीच नव्हते. क्रांतिकारकांना नाउमेद न करताही वेळोवेळी त्यांनी सबुरीचा सल्ला दिला. मंडालेला जाण्यापूर्वी आपण सिंहगडावर या विषयावर शांतपणे बोलू, तोपर्यंत काही गडबड करू नका, असे त्यांनी सांगितले होते व बापटांनी ते मानले. अज्ञातवासातून सुटून आल्यावर बापटांनी काही वर्षे विधायक कामात घालवली. १९१४ मध्ये मंडालेहून सुटून लोकमान्य पुण्यात आले. बापटांनी सुरुवातीला वासू काका जोशींच्या ' चित्रमय जगत् ' मध्ये काम केले. सदाशिव पेठेतील चित्रशाळेत हे कार्यालय होते. बापटांचे बिऱ्हाडही तिथून जवळच गायआळी राममंदिराच्या पिछाडीला होते. चित्रशाळेत नेहमी लोकमान्य टिळक, शिवरामपंत परांजपे, काकासाहेब खाडीलकर अशा राजकारण्यांचा अड्डा जमत असे. त्यांच्या या गप्पांमध्ये बापटही अधूनमधून सहभागी होत. बापटांचे देशाच्या स्वातंत्र्याबाबतचे विचारही हळूहळू परिपक्व होत चालले. विचारसरणी जहालच होती पण तरुण वयातील उतावीळपणा थोडा कमी झाला.

लोकमान्यांनी बापटांना हेरून ठेवले होते.. बापटांना लेखनाची आवड होती. त्यांच्या मनातील देशप्रेमाबद्दल तर शंकाच नव्हती. एक दिवस लोकमान्यांच्या सांगण्यावरून वासुकाकांनी बापटांना केसरी-मराठा-कार्यालयात बोलावून घेतले आणि विचारले,

" बापट, आमच्या केसरी-मराठ्यात काम करायला याल का ?"

" मोठ्या आनंदाने ! लोकमान्य हे तर माझं श्रद्धास्थान. यापुढे त्यांचा सतत सहवास मिळत राहील."

" पण तुम्ही पगार काय घेणार ?"

" पगार ना ! द्या आपला भाकरीपुरता."

त्या काळात तीस रुपये पगारावर बापटांची ' मराठा ' च्या संपादक-विभागात नेमणूक झाली. अवघ्या तीस रुपये पगारात बापट त्यांच्या संसाराचा खर्च कसा भागवणार होते, हे त्यांचे त्यांनाच माहिती. प्रत्येक गोष्टीला, आल्या प्रसंगाला तोंड द्यावे लागायचे रुक्मिणीबाईंनाच. क्रांतिकारकाची पत्नी म्हणून ही खडतर तपश्चर्याच होती. सरकारने बापटांना जाणूनबुजून मोकळे ठेवले होते. त्यांना कोणकोण भेटतात यावर सरकारी अधिकाऱ्यांची बारीक नजर होती. बापटांकडे सुरुवातीला ' मराठा ' कचेरीत नाममात्र असे भाषांतराचे काम देण्यात आले. त्या वेळी वामन मल्हार जोशी हे ' मराठाचे ' संपादक होते. पुढे वामनरावांनी महर्षी कर्वे यांच्या शाळेत मुख्याध्यापक म्हणून नोकरी पत्करली. आणि बापट हळूहळू ' मराठाचे ' मुख्य संपादक म्हणून काम पाहू लागले.

लोकमान्य व बापट दोघेही क्रांतिकारी .व जहाल विचारसरणीचे. पण बापटांना लोकमान्यांसारखे युक्ती-प्रयुक्तीने लिहिणे जमत नसे. लिहायचे ते सारे सडेतोड आणि अगदी उघडपणे हा बापटांचा खाक्या होता. यावरून बऱ्याच वेळा दोघांचे खटके उडत. मग लोकमान्य कधीतरी बापटांना सिंहगडावर घेऊन जात आणि शांतपणे समजून सांगत,

" बापट मीही तुमच्यासारखाच क्रांतिकारी विचारांचा आहे. पण आपले लोक अजून फार मागे आहेत. क्रांतिकारी उठाव करण्याइतपत त्यांच्या मनाची अजून तयारी झालेली नाही. या लोकांना बरोबर घेऊन राजकारण करायचे

म्हणजे जरा सबुरीनेच घ्यायला हवे. तुमच्यासारखेच हजार बापट जर मला अनुयायी म्हणून मिळाले तर मी आत्ता बंडाचा झेंडा उभारतो."

१९१८ च्या सुमारास पंजाबमधील लष्करातल्या काही युरोपियन अधिकाऱ्यांनी महिलांवर अत्याचार केल्याची बातमी केसरीमध्ये छापून आली. ती बातमी वाचून बापटांचे माथे भडकले, यांना कुणीतरी जाब विचारायला हवा. या अन्यायाविरूद्ध आवाज उठवायला हवा. या विचारांनी ते अस्वस्थ झाले. या प्रकरणी सार्वजनिक सभेमार्फत. गायकवाड्यातच बापटांचे एक स्फोटक व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी होते स्वत: लोकमान्य टिळक. व्याख्यानाला अफाट गर्दी जमली होती. व्याख्यान तास दीड तास अगदी खणखणीत आवाजात झाले. बापटांनी खऱ्या अर्थाने सभा गाजवली. अध्यक्षस्थानी लोकमान्य असल्यामुळे बापट सुरुवातीला थोडेसे विचारपूर्वक आणि कायद्याच्या चौकटीत बसेल असे बोलले. पण हे त्यांच्या स्वभावात बसणारे नव्हते. थोड्याच वेळात त्यांच्यातील उसळून उठण्याची प्रवृत्ती जागी झाली आणि मग अक्षरश: त्यांच्या मुखातून अग्निवर्षाव सुरू झाला. आपल्या या जहाल भाषणाचा काही विपरीत परिणाम होऊ शकेल याचा त्यांना विसर पडला. आणि मग थोड्या वेळाने भानावर आल्यावर त्यांनी जाहीर केले, " या भाषणातील विधानांची जबाबदारी माझ्या एकट्यावर आहे. सार्वजनिक सभा किंवा सभेचे अध्यक्ष लोकमान्य टिळक यांपैकी कोणीही या मतप्रदर्शनाला जबाबदार नाही." बापटांनी असे म्हणताच लोकमान्यांनी पटकन् उभे राहून जाहीर केले,

" नाही. ही जबाबदारी एकट्या बापटांची नाही. ती आम्हा सर्वांची आहे."

लोकमान्यांच्या या उद्‌गारांनी बापट चकित झाले. एखाद्या अनुयायाला आपल्या पंखाखाली घेतल्यानंतर लोकमान्य त्याला कधी उघडा पडू देत नसत. या भाषणाबद्दल लोकमान्यांनी बापटांची प्रशंसाच केली.

" बापटांसारख्या जिवावर उदार झालेल्या देशभक्तांचा संच तयार व्हायला हवा. " असे त्यांनी सहकाऱ्यांजवळ बोलून दाखवले.

एक दिवस बापट मराठाच्या कचेरीत आले ते मोठ्या खुशीतच. जो भेटेल त्याला ते मुठीमुठीनें चणे मुरमुरे वाटत होते.

" का हो बापट. आज हे काय आणलंत !"

" आहो याला म्हणतात लेनिन मिक्श्चर. हे गरीबांचे खाणे. लेनिन हा तर गोर-गरिबांचा पुढारी. म्हणून त्याचंच नाव या खाद्याला देऊन टाकलं."

" पण आज हे मिक्श्चर वाटण्याचं काही खास कारण ?"

" कारण तर आहेच. आजचा दिवस हा सुवर्णाक्षरांनी लिहिण्यासारखा आहे. रशियामधली झारशाही याच दिवशी संपुष्टात आली. तिथल्या क्रांतिकारकांनी कधी गुप्तपणे, तर कधी उघडपणे असा या हुकुमशाहीविरूद्ध सतत लढा दिला.

आता तिथे लोकांचं राज्य स्थापन झालं. या रशियन क्रांतीपासून आपल्याला खूप काही शिकण्यासारखे आहे. आता उद्या मराठ्यामध्ये याच विषयावर लेख लिहितो."

" छान छान " असे म्हणत सर्वांनी ते लेनीन-मिक्श्चर फस्त केले.

बापटांनी मूळच्या स्वभावानुसार रशियन क्रांतीचे निमित्त करून त्यांची जहाल मते मांडली, तर लोकमान्यांनी याच विषयावर ' केसरी ' मध्ये साधकबाधक चर्चा करणारा लेख लिहिला. त्यामुळे दोघांतील मतभेद उघड झाले. बापटांच्या लेखणीला आवर घालणे कठीण झाले हे लोकमान्यांनी ओळखले. पुढे तात्यासाहेब केळकरांबरोबर विलायतेला जाताना लोकमान्यांनी मोठ्या विचारपूर्वक ' मराठा 'च्या संपादकाची जबाबदारी बापटांकडे न सोपवता त्यांच्यानंतर उपसंपादक म्हणून लागलेल्या दा. वि. गोखले यांच्यावर सोपवली. बापटांना हा अपमान वाटला व त्यांनी ' मराठा 'तल्या नोकरीचा राजीनामा दिला. पुढे त्यांना ज्ञानकोशाच्या कचेरीत नोकरी मिळाली. मतभेद झाले तरी बापटांच्या मनात असणारा लोकमान्यांविषयीचा आदर कोठेही कमी झाला नाही.

पुढे १९२० च्या जुलै महिन्यात ज्ञानकोशाच्या काही कामासाठी बापट मुंबईला गेले होते. लोकमान्यांच्या आजारपणाचे ते शेवटचे दिवस होते. बापट अस्वस्थपणे सरदारगृहात लोकमान्यांच्याजवळ बसून होते. बापटांचे चित्त थाऱ्यावर नव्हते. इकडे त्याच सुमारास त्यांच्या पत्नी रुक्मिणीबाई खूप आजारी पडल्या. तिची एकदा धावती भेट घेऊन बापट पुन्हा सरदारगृहात हजर झाले.

लोकमान्यांचा मृत्यू झाला त्या वेळी बापटांना शोक आवरेना. मुंबई शहराने अशी अभूतपूर्व अंत्ययात्रा पुन्हा कधी अनुभवली नाही. अंत्ययात्रा उरकून बापट लोकमान्यांच्या अस्थींबरोबर पुण्यात आले. या अस्थींची भली मोठी मिरवणूक निघाली. इकडे रुक्मिणीबाईंची प्रकृती आणखी खालावली. लोकमान्यांच्या प्रकृतीबद्दल त्यांच्या कानावर येतच होते," लोकमान्य गेले का रे ?" त्या येणाऱ्याजाणाऱ्याला विचारू लागल्या. प्रकृतीच्या तशा अवस्थेत त्यांना कुणी ही बातमी सांगितली नाही, तरीही रस्त्यावरून चाललेली गडबड पाहून त्या काय समजायचं ते समजल्या,

" त्यांना बोलावून घ्या. मीही आता जगेन असे वाटत नाही."

रुक्मिणीबाईंचे भाऊ बापटांना मिरवणुकीत घरी बोलवायला आले. पत्नी अस्वस्थ असल्याचे सांगण्यात आले. पण लोकमान्यांच्या मृत्यूच्या दु:खात बापट इतके बुडून गेले होते की, त्यांना क्षणभर पत्नीच्या आजारपणाचाही विसर पडला होता.

" एवढी मिरवणुक संपवून येतो " असा त्यांनी निरोप दिला., रुक्मिणीबाईंच्या कंठाशी प्राण आले होते. पतीच्या भेटीसाठीच त्या व्याकूळ झाल्या होत्या. बापट येईपर्यंत त्यांना घरघर लागली. बापट आले. रुक्मिणीबाईंनी त्यांना डोळे भरून पाहिले आणि " मुलांना सांभाळा. त्यांना सोडून कुठे जाऊ नका." असे सांगून त्यांनी प्राण सोडला. लोकमान्यांच्या मृत्यूच्या धक्क्यातून सावरायच्या आतच ४ ऑगस्ट १९२० सायंकाळी ७ वाजता पत्नीचीही प्राणज्योत मालवली. बापटांच्या दृष्टीने एकीकडे सार्वजनिक जीवनात पोकळी, तर दुसरीकडे कौटुंबिक जीवनही उजाड !

***

# तात्या सेनापती झाले

तात्या बापटांनी पद्धतशीरपणे लष्करी शिक्षण घेतल्याचे ऐकण्यात आले नाही. लष्कराशी त्यांचा प्रत्यक्ष असा क्वचितच संबंध आला असेल. असे हे तात्या सेनापती कधी झाले ? शिवाजी महाराजांना कुणी छत्रपतीपद किंवा राजपद बहाल केले नव्हते, देणगी म्हणूनही दिले नव्हते. प्रथम त्यांनी जनतेच्या हृदयात स्थान मिळवले, आणि मग जनतेने आपणहून त्यांना सिंहासनावर बसवले. तात्या बापटांच्या बाबतीतही असेच झाले. भारतीय इतिहासामध्ये दोन तात्या सदैव स्मरणात राहतील. एक १८५७ च्या स्वातंत्र्यसमरातील सेनापती तात्या टोपे व दुसरे मुळशीच्या संग्रामाचे नेतृत्व करणारे सेनापती तात्या बापट. ज्या लढ्यामुळे बापटांना सेनापतीपद मिळाले त्याची हकीकत सुद्धा मोठी रोमहर्षक आहे.

१९२१ च्या सुमारास घडलेली ही हकीकत आहे. पुणे जिल्ह्याच्या मावळ तालुक्यातील मुळशी भाग म्हणजे आंबेमोहोर तांदुळाचे आगर. या भागात लहानमोठे अनेक शेतकरी आपल्या शेतात भाताचे पीक काढत. हा भाग तिथल्या तहशीलदाराच्या अधिकारात येत होता. त्या काळात टाटा कंपनी म्हणजे भारतातील प्रसिद्ध उद्योगसमूह. मुंबई भागात कारखानदारी झपाट्याने वाढत होती. या कारखान्यांसाठी आणि मुंबई शहरातील वाढत्या लोकसंख्येसाठी मोठ्या प्रमाणात विद्युत-निर्मिती करण्याची भव्य योजना टाटा कंपनीच्या अधिकाऱ्यांनी आखली. सह्याद्रातून उगम पावणाऱ्या लहानमोठ्या अनेक नद्यांचे पाणी बंधारे बांधून अडवायचे, काही नद्यांवर धरणे बांधायची आणि

मोठ्या प्रमाणात वीजनिर्मिती करायची असा कंपनीचा मनोदय होता. पण हे करत असताना या नद्यांच्या परिसरातील शेतकऱ्यांचे काय ? हे शेतकरी भूमीहीन होणार. त्यांच्या उपजीविकेचे साधन काय ? याबाबत गंभीरपणे विचार करण्याची गरज कंपनीला वाटली नाही. इंग्रज सरकार तर पूर्णपणे कंपनीच्या पाठीशी सर्व ताकदीनिशी होते. इंग्रजांच्या जमीनधारणा कायद्यानुसार शेतकऱ्यांच्या जमिनी उद्योगपती किंवा सरकार यांनी त्यांच्या संमतीशिवाय ताब्यात घ्याव्या, त्याने फार आरडाओरडा करायला सुरुवात केली तर थोडेफार पैसे त्यांच्या तोंडावर फेकावेत, असा मनमानी कारभार चालू होता. आधीच शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन सावकार त्याला कायमचा कर्जबाजारी करून नागवत होते. शेतकऱ्याच्या हातात थोडाफार पैसा मिळाला तरी सावकारच तो हडप करायचा. शेतकरी पुन्हा कायमच्या गुलामगिरीत आणि दारिद्र्यात. ना दाद, ना फिर्याद !

मुळा आणि निळा या नद्यांच्या संगमावर टाटा कंपनी एक मोठे धरण बांधणार होती. या मुळशी-धरणामुळे ५४ खेडी आणि आसपासची जमीन पाण्याखाली जाणार होती. एक दिवस 'केसरी'मध्ये बातमी छापून आली. "मुळशी-पट्ट्यातील ताम्हीण खोऱ्यात टाटा कंपनीने बोगद्यांचे काम सुरू केले आहे. कंपनीच्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या जमिनीत मन मानेल तसा धुमाकूळ घातला. पण एका शेतकऱ्याने कंपनीच्या अधिकाऱ्याला शेतावर येऊ दिले नाही. कंपनीच्या गोऱ्या अधिकाऱ्याने शेतकऱ्यावर पिस्तुल रोखले पण तरीही तो डगमगला नाही. अशा प्रकारचे अत्याचार झाले तर सर्व शेतकरी सत्याग्रह करतील." बापटांनी ही बातमी वाचली. एखादी वीज चमकून जावी तसा डोक्यात विचार उठला, " या शेतकऱ्यांना कोण न्याय मिळवून देणार ? त्यांची बाजू घेऊन कोण लढणार ?" बापटांच्या मनात दिवस रात्र तोच विचार, " या शेतकऱ्यांसाठी मला काय करता येईल ?" दुसरे मन सांगत होते की, "आपल्याला यांत्रिक प्रगती साधायची असेल तर अशा काही गोष्टी सहन करायला पाहिजेत."

केसरीतील बातमी वाचून दैनिक लोकसंग्रहाचे वार्ताहर विनायक भुस्कुटे प्रत्यक्ष मुळशी-भागात पाहणी करण्यासाठी गेले. आजूबाजूला नजर टाकली. शेतांमधून भाताची रोपे वाऱ्यावर छानपैकी डुलत होती. या भागातून हजारो खंडी भात ठिकठिकाणी पाठवला जातो. असा हा सोन्यासारखा मुलुख टाटा कंपनी

पाण्याखाली बुडवणार, या कल्पनेने त्यांच्या अंगावर काटा उभा राहिला. 'केसरी 'चे संपादक तात्यासाहेब केळकर यांनीही या भागाला भेट देऊन परिस्थितीची पहाणी केली. सत्याग्रह केल्याशिवाय शेतकऱ्यांना न्याय मिळणार नाही, अशी त्यांचीही खात्री झाली. केसरीकारांनी मनावर घेतले. सत्याग्रहासाठी त्यांनी वर्तमानपत्रातून प्रचाराची आघाडी उघडली. शेतकऱ्यांतून काही नेते मंडळी पुढे आली. त्यांनी मुळशी भागात हिंडून शेतकऱ्यांची संघटना बांधायला सुरुवात केली. सत्याग्रहासाठी १६ एप्रिल १९२१ म्हणजे रामनवमीचा दिवस निश्चित करण्यात आला.

बापट त्या वेळी पुण्यातील ज्ञानकोशाच्या कार्यालयात काम करत होते. सत्याग्रहात भाग घ्या म्हणून आग्रह करण्यासाठी बाळूकाका कानीटकर बापटांकडे आले. पण अजूनही सत्याग्रह करावा की नाही, याचा बापटांच्या मनात निश्चय होत नव्हता. रात्री बऱ्याच वेळपर्यंत दोघांची चर्चा चालू होती. बाळूकाकांनी बापटांना सत्याग्रहासाठी तयार करायचेच अशा पद्धतीने त्यांचे मन वळवायचा प्रयत्न केला व अखेर बापटांना बाळूकाकांची भूमिका पटली. सत्याग्रह करून टाटा कंपनी आणि सरकार यांना शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेण्यापूर्वी त्यांची पर्यायी व्यवस्था करायला भाग पाडायचे, असा बेत ठरला. रात्रभर बापटांना झोप आली नाही. त्यांच्या मनातल्या श्रीहरीने कौल दिला की, शेतकऱ्यांचा सर्वनाश करून निर्माण केलेली वीज आम्हाला नको. सत्याग्रहात हिरिरीने भाग घ्यायचा असा निश्चय झाला. त्याचप्रमाणे त्यांनी नोकरीचा राजीनामाही दिला.

भारताच्या राजकारणात सत्याग्रहाचे तंत्र मुख्यत: महात्मा गांधींनी आणले. सत्याग्रही मार्गाने दक्षिण आफ्रिकेमध्ये राहून त्यांनी उमेदीची २१ वर्षे लढा देऊन हिंदी बांधवांना न्याय मिळवून दिला. त्यांचे नाव सर्वतोमुखी झाले आणि लोकमान्यांच्यानंतर हिंदी राजकारणाचे नेतृत्त्व त्यांच्याकडेच आले. अन्यायाविरुद्ध शांततामय मार्गाने प्रतिकार करणे हे तर सत्याग्रहाचे मुख्य सूत्र. सेनापती बापट हे तसे क्रांतिकारक विचारांचे. या सत्याग्रहात ते कसे सहभागी झाले याबद्दल अनेकांना आश्चर्य वाटते. पण सेनापतींच्या जीवनाला आध्यात्मिक बैठक असल्यामुळे सत्याग्रही मार्ग हा सुद्धा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचाच एक निराळा पैलू होता.

सत्याग्रहाची सर्वत्र जोरदार तयारी सुरू झाली. एखाद्या लग्न-समारंभाला घालतात तसा भला मोठा मंडप मुळशीच्या रानात घातला होता. जान की जमीन अशा निर्धाराने मावळे लोक लढ्यासाठी सिद्‌ध झाले. ‘ केसरी ’ कारांचा तर याला पूर्ण पाठिंबा होता. टाटा कंपनीच्या अधिकाऱ्यांनी मावळ्यांत फूट पाडायचा प्रयत्न चालवला: त्यांच्याशी गोड बोलून, लालूच दाखवून आणि प्रसंगी धाकदपटशा आणि मारहाण, असा अनेक प्रकारे या लढ्याला खीळ घालण्याचा प्रयत्न झाला. पण मावळ्यांचा निर्धार कायम होता. मावळ्यांच्या निरनिराळ्या तुकड्या खंदकांमध्ये उतरल्या. सुरुवातीला एका तुकडीचे नेतृत्व बापटांकडे होते. कंपनीचे मजूर बांधकामासाठी चरात उतरले की, त्यांच्या पाठोपाठ सत्याग्रही उड्या टाकत. त्या मजुरांचे पाय धरून त्यांना विनंती करत.

“ तुम्हाला जसं पोट आहे तसं आम्हालाही आहे. या शेतावर तर आमचं सारं जीवन. या धरणामुळे आमची घरं, दारं, शेतं सारं पाण्याखाली जाणार. आमच्या गरीबांवर दया करा. आणि हे बांधकाम बंद करा.”

शेतकऱ्यांबद्दल दया येऊन मजूर त्यांच्या हातांतली कुदळी फावडी बाजूला ठेवून हात जोडून उभे रहात. इतकेच नाही तर, मजुरांच्या संरक्षणासाठी आणलेले पोलीस सुद्धा स्वस्थ बसून राहिले. त्यांची पण शेतकऱ्यांच्या या लढ्याला सहानुभूती होतीच. काम न करता कंपनीला मजुरांना मजुरी द्यावी लागत होती. कंपनीने सत्याग्रहींशी वाटाघाटी सुरू केल्या. सहा महिन्यांपर्यंत बांधकाम बंद ठेवण्याचे आश्वासन दिले. पण बापटांनी आग्रह धरला, केवळ मुळशीतलीच नाही, तर इतर ठिकाणी सुद्धा चाललेली अशा प्रकारची कामे तावडतोब बंद करावीत. मुळात सहा महिने मुदत वाढवून देणे यात कंपनीचा काहीतरी डाव आहे हे बापटांनी ओळखले. मावळ्यांची संघटना मोडण्यासाठी कंपनीला त्यातून अवधी मिळणार होता. सत्याग्रहाची शिस्त म्हणून बापटांनी सुरुवातीला काही गडबड केली नाही. मुळशीवरून परत येत असताना वाटेमध्ये पौडमध्ये त्यांना थोडीशी चकमक उडाल्याचे दिसले. मुळशीवरुन पौडला जायला एकमेव असा बैलगाडीचा रस्ता. पण या रस्त्यावर रेल्वचे रूळ टाकून मुळशीपर्यंत रेल्वे जाणार होती. त्यामुळे हा रस्ता नेहमीच्या वाहतुकीसाठी

कायमचा बंद होणार होता. रात्रीतल्या रात्रीत शेतकऱ्यांची परवानगी न घेता त्यांच्या शेतातून रेल्वे-रूळ घातले. कंपनीचे अधिकारी आणि शेतकरी यांच्यात बाचाबाची चालली होती. मग तेव्हापासून रात्री कंपनीने रूळ घालायचे आणि सकाळी शेतकऱ्यांनी उखडून टाकायचे असा प्रकार सुरू झाला. बापटांचा तिथून पाय निघेना. रात्रभर त्यांनी शेतकऱ्यांच्या शेतावर मुक्काम केला. त्यांची गाऱ्हाणी ऐकून घेतली. इकडे वाटाघाटींचे नाटक करायचे आणि तिकडे दडपून कामे चालूच ठेवायची, शेतकऱ्यांनी विरोध केला तरी त्याकडे दुर्लक्षच करायचे असा प्रकार चालू होता. बापटांना स्वस्थ बसणे शक्य नव्हते. या शेतकऱ्यांना हाताशी धरून दहा/बारा दिवस लढा त्यांनी हिमतीने लढवला. सत्याग्रहाच्या नियमानुसार बापटांनी कंपनीकडे लेखी निवदन दिले. काम थांबविण्यासाठी काही मुदत दिली. मुदत संपली तरी कंपनीकडून काहीच हालचाल नाही. मग शेतकऱ्यांनी पठाणांच्या देखरेखीखाली चाललेले बांधकाम बंद पाडायचे ठरवले. पौडापासून फर्लांगभर रूळ उखडण्यात आले. चिंचवडजवळचा रूळ-रस्ता पण उखडून काढण्यात आला. कंपनीने या प्रकाराची गंभीरपणे दखल घेतली. बापट आणि त्यांच्यासह वीस सत्याग्रहींना पकडण्यात आले. चार महिने खटला होऊन बापटांना शंभर रुपये दंड आणि सहा महिन्यांची साधी कैद अशी शिक्षा झाली. सत्याग्रहाच्या काळात कंपनीच्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांचा खूप छळ केला. पण त्यांनी सत्याग्रहाची शिस्त मोडली नाही. बापटांच्या आयुष्यातील हा पहिलाच तुरुंगवास. तुरुंगातून सुटल्यावर बापटांनी या लढ्यासाठी जनजागृती करायला सुरुवात केली. सुरुवातीला बाळूकाका कानिटकरांच्या सांगण्यावरून बापट सत्याग्रहात सामील झाले. आणि आता हळूहळू ते या लढ्याचे सूत्रधारच बनले. अगदी नकळतपणे सेनापतीपद त्यांच्याकडे चालत आले.

आता यापुढचा लढा नुसता टाटा कंपनीबरोबर नव्हता. इंग्रज सरकारही या लढ्यात कंपनीची बाजू घेऊन उतरले. शेतकऱ्यांच्या जमिनीसाठी नाममात्र

पाचशे रुपये भरपाई देऊन सरकारने जबरदस्तीने जमिनी ताब्यात घ्यायला सुरूवात केली. पण मावळ्यांनी हजार रुपये दिलेत तरी जमीन देणार नाही, असा निर्धार बोलून दाखवला. तुरुंगात असताना सुद्धा बापटांचा सत्याग्रहासाठी प्रचार चालूच असायचा. सत्याग्रहींना ते तुरुंगातून काव्यमय संदेश पाठवत.

" कसाही छळो वैरी सत्याग्रहात
कसाही छळो वैरी कारागृहात
आम्ही पांडवांसारखी शिस्त पाळू
मनीच्या मनी क्रोध जाळून काढू."

१ मे १९२२ पासून मुळशीचा दुसरा सत्याग्रह सुरू झाला. यात बापटांच्या बरोबरीने शिवरामपंत परांजपे, वासुकाका जोशी, तात्यासाहेब करंदीकर, सीतारमपंत दामले अशा अनेकांना तुरुंगवासाची शिक्षा झाली. तुरुंगातून सुटल्यावर बापटांनी पुन्हा सत्याग्रहाची आखणी केली. त्यांनी सत्याग्रहाचे दोन भाग केले. काही जण साम सत्याग्रह करणार. म्हणजे शत्रूचा सामोपचाराने व शांततेच्या मार्गाने प्रतिकार करणे. हा ज्या वेळी अयशस्वी होई, त्या वेळी दुसरा शुद्ध सत्याग्रह. या शुद्ध सत्याग्रहात शत्रूवर शस्त्राचा वापर करून दबाब आणणे हा भाग होता. शस्त्राचा वापर आक्रमणासाठी नव्हे, प्रतिकारासाठी, ही त्या मागची भूमिका.

दरम्यान सत्याग्रह मोडून काढण्यासाठी इंग्रज सरकार व टाटा कंपनी एक झाले. मुळशी पेट्यात सक्तीने शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेण्याचा कायदा लागू झाला. बापटांनी तर प्रचाराचा धडाका लावला. विशेषत: गणेशोत्सवातील मेळ्यांचा त्यांनी या कामी चांगला उपयोग करुन घेतला. कवी कुंजविहारी यांनी लिहिलेला मुळशीचा पाळणा त्या काळी खूप लोकप्रिय झाला. सेनापती प्रचारासाठी गावोगावी जात, धर्मशाळेत, देवळात किंवा एखाद्या गरीब शेतकऱ्याच्या झोपडीत ते उतरत. नेहमीप्रमाणे सकाळी ग्रामसफाई मग सत्याग्रहाच्या प्रचारासाठी सभा, मेळे असे कार्यक्रम. एकदा तर मोठी गंमत झाली. २ सप्टेंबर १९२२ पासून बापट मोठ्या सत्याग्रहाला सुरुवात करणार

असे जाहीर झाले होते. मुंबईला सत्याग्रह-कचेरीच्या भोवती पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त. पौड-लोहगड मार्गावर मुळशीपर्यंत सतत जागता पोलीस- पहारा होता. बापट सत्याग्रहासाठी बाहेर पडले की, त्यांना तात्काळ पकडायचे अशी जय्यत तयारी केली होती. बापट पकडले गेले तरी सत्याग्रह चालूच ठेवायचा अशी सत्याग्रहींनी तयारी केली होती. ऐनवेळी सत्याग्रहाच्या दिवशी बापट सत्याग्रहाच्या ठिकाणी टेकडीच्या मागच्या भागावरून गर्जना करीत प्रकट झाले. पोलिसांनी तर आश्चर्याने तोंडात बोट घातले. बापटांना पाहून सत्याग्रही सुद्धा चकित झाले. मावळ्यांनी बापटांभोवती गराडा केला. प्रश्नामागून प्रश्न सुरू,

" तात्या हे कसं जमवलंत ?"


" आणि पोलिसांनी तुम्हाला पाहिलं कसं नाही ?"

" त्याचं असं झालं. माझ्या ओळखीतलाच एक पाववाला भेटला. मी म्हटलं, चल, पटकन् मला तुझे कपडे आणि पावाची पाटी दे. त्याने ते दिले, आणि वाटेत पाव विकत विकत चोरवाटेने रात्रीच आलो. एका झोपडीत झोपलो आणि आज सकाळी सत्याग्रहासाठी हजर."

मावळ्यांना तर ही सारी अद्‌भुत कहाणीच वाटली. ते बापटांच्या पाया पडू लागले. पण बापटांनी त्यांना उठवले, " पाया पडू नका. मी सूचना दिल्याप्रमाणे आता कामाला लागा." मावळ्यांत उत्साह संचारला आणि सत्याग्रहाचा जोर वाढला. बापटांना सहा महिने तुरुंगवास. तुरुंगवास म्हणजे खरोखरीच दिव्य होते. अंग-मेहनतीचे भरपूर काम आणि खायला कदन्न. शिवाय फटके मारणे, दंडाबेडी अशा शिक्षा होत्याच. बापटांना अशा प्रकारच्या तुरुंगवासाचा मुळशी-सत्याग्रहाच्या वेळी अनेकदा अनुभव घ्यावा लागला. पण यापेक्षाही त्यांच्या आयुष्यातील सर्वात कठीण काळ म्हणजे त्यांना मुळशी- सत्याग्रहात शुद्ध सत्याग्रह केला म्हणून झालेली सात वर्षांची शिक्षा. शुद्ध सत्याग्रह हा काय प्रकार आहे ? इथपर्यंतचा लढा हा सेनापतींनी पूर्णपणे महात्माजींच्या अहिंसेच्या तत्त्वाप्रमाणे चालवला होता. पण बापटांच्या लक्षात आले, शत्रू पूर्णपणे शस्त्रसज्ज व सत्याग्रही निःशस्त्र हा प्रकार किती दिवस चालणार ? सत्याग्रहींच्या सहनशक्तीला सुद्धा काही मर्यादा आहेत. सेनापतींनी जाहीर केले, " सत्याग्रहींनी आता शस्त्र धारण करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. शुद्ध हेतूंसाठी हातामध्ये शस्त्र धारण करण्यास कोणीही विरोध करू नये."

सेनापतींचे काही साथीदार या विचारांमुळे त्यांच्यापासून दुरावले. पण सेनापतींनी निवडक सत्याग्रहींना बरोबर घेऊन हे धाडसी पाऊल उचलायचे ठरवले.

" टाटा कंपनीची गाडी आम्ही आडवणार व त्यासाठी जरूर तर शस्त्रांचाही वापर करणार " असे त्यांनी उघडपणे जाहीर केले. सत्याग्रहाच्या तत्त्वाप्रमाणे सर्व गोष्टी उघडपणे आणि सांगून सवरून केल्या जात.




सेनापती हातात पिस्तुल व तलवार घेऊन थांबलेल्या आगगाडीकडे धावले.

९ डिसेंबर १९२५. सत्याग्रहींनी गाडी थांबविण्यासाठी रेल्वे-रुळांवर दगडांची रास रचली. सेनापती एका हातात तलवार, कंबरेला जंबिया व दुसऱ्या हातात पिस्तुल अशा थाटात हजर झाले. ड्रायव्हरने गाडी थांबवली. दगड दूर सारण्यासाठी गाडीतले काही मजूर उतरले. सत्याग्रही तलवारी घेऊन मजुरांच्या अंगावर धावले. सेनापतीनी नेम धरून इंजिन ड्रायव्हरच्या कमरेखाली गोळी

झाडली. त्यांच्यावर खटला भरण्यात आला. खटला खूपच गाजला. सेनापतींनी कबुली जबाबात सांगितले,

" स्कॉटलंडमध्ये असताना मी पिस्तुल चालविण्याचे शिक्षण घेतले. ड्रायव्हरला ठार मारायचे असते तर ते मी केव्हाही करू शकलो असतो. मला त्याला फक्त धडा शिकवायचा होता. म्हणून गोळी घालून नाममात्र जखमी केले."

या प्रकरणी सेनापतींना सात वर्षे तुरुंगवासाची शिक्षा झाली. या प्रदीर्घ तुरुंगवासातील वेळेचाही त्यांनी सदुपयोग केला. उपनिषदांचे 'Holy Songs' या नावाने त्यांनी भाषांतर केले.

सेनापती तुरुंगात असताना सत्याग्रहाचा लढा शिथिल झाला. काही शेतकऱ्यांनी स्वार्थापोटी त्यांच्या जमिनी कंपनीला विकून टाकल्या. कंपनीने मुळशी-धरण पूर्ण केले आणि सेनापतींच्या जीवनातल्या मुळशी- संग्रामाची अशी दुर्दैवी अखेर झाली. पण या संग्रामात तात्यांच्या अंगची निःस्वार्थी वृत्ती, त्याग, धाडसीपणा, सोशिकता असे अनेक गुण दिसून आले. मुळशी सत्याग्रहामुळे बापटांना सेनापतीपद चिकटले ते कायमचेच.

***


म. वं. नं. ठाणे, वाचनालय ठाणे.
बाल ग्रंथालय विभाग
वा. क्र. २८७६
विषय

# मुलांचे तात्या

पंडित नेहरूंना मुले फार आवडत. मुलांच्या दृष्टीने ते नेहरू-चाचा होते. त्यांचा जन्मदिवस हा ' बालदिन ' म्हणून साजरा केला जातो. सेनापती बापटांच्याबाबत सुद्धा त्यांना ' मुलांचे तात्या ' म्हणणे अधिक योग्य ठरेल. लहान मुलांच्या वाट्याला ते फारच थोड्या वेळा येत. पण मुलांशी त्यांची चटकन् गट्टी जमत असे. पत्नी गेल्यानंतर, आपण आपल्या मुलांकरता फार काही करू शकलो नाही, याची बोच त्यांच्या मनाला सतत सलत राहात असे. कमल आणि वामन दोन्ही मुले लहान असताना, त्यांच्यात तात्यांना कोण जास्त आवडते याबाबत स्पर्धा चाले. पण सेनापतींचे दोन्ही मुलांवर सारखेच प्रेम. तुरुंगात असताना ते मुलांना पत्र पाठवून स्वत:चे विचार कळवत. कमलचे पातळ आणि वामनचे पांघरूण या दोन्हींची मिळून त्यांनी गोधडी शिवली. कुठेही गेले तरीही प्रेमाची ऊब नेहमी बरोबर असे. तात्यांची स्मरणशक्ती अशी दांडगी की, दादरला रहात असताना गोखलेवाडीच्या आसपास राहणाऱ्या सर्व मुलांची नुसती नावेच काय, पण त्यांचे स्वभावविशेष सुद्धा तात्यांच्या चांगले लक्षात रहात. तात्यांच्या राहत्या घराची गच्ची म्हणजे मुलांना जणू काही आंदणच दिल्यासारखी. मुलांनी हवा तेवढा दंगा करावा पण तात्या रागवत नसत. कुणी त्यांना अभ्यासातली शंका विचारी, तर कुणी त्यांना गोट्या खेळायला घेऊन जाई. मुलांना गोष्टीची पुस्तके वाचून दाखवणे हा तर त्यांचा नेहमीचाच उद्योग आजूबाजूच्या प्रौढ माणसांना सेनापती ओळखणारही नाहीत. पण सरोज, नंद्या, अशोक, मंजू यांच्याशी छानशी मैत्री. मुलांनी तात्यांपाशी काय मागावे किंवा कशासाठी हट्ट धरावा याला मर्यादाच नव्हती. एकदा अशीच गंमत झाली.

गणेश-उत्सवात वक्तृत्व-स्पर्धा होती. विषय होता. ' भारत आणि हिंदुस्थान ' ज्यांनी कुणी हा विषय मुलांच्या वक्तृत्व-स्पर्धेसाठी निवडला त्यांच्या बुद्धीची कीव करावी तेवढी थोडीच, " मला या विषयावर माहिती सांगा " म्हणून एक मुलगी हट्ट धरून बसली. तात्या कसल्या तरी महत्त्वाच्या लिखाण-कामात गढून गेले होते. त्यांनी तिला सूनबाईकडे जायला सांगितले. सूनबाईंना तरी या विषयावर कितीशी माहिती असणार ? मला माहिती मिळाली की, तुला सांगते असे म्हणून तिने मुलीला वाटेला लावले. पण तात्यांच्या डोक्यातल्या कुठल्या तरी कप्प्यात या बारीक प्रसंगाची नोंद झाली. दुसऱ्या दिवशी दुपारी १ च्या सुमारास तात्या त्या मुलीच्या घरी हजर. " सरोज कुठे आहे ?" तात्यांचा प्रश्न. दुपारची वेळ. घरात दुपारचा वडिलधाऱ्यांचा नुकताच डोळा लागला होता. एवढ्या मोठ्या माणसाला असे अचानकपणे आलेले पाहून सारेच गडबडले. मग ती परकरी पोर सरोज तात्यांसमोर आली. तात्या बरोबर एका वृत्तपत्राच्या उपसंपादकाला घेऊन आले होते. कशासाठी ? सरोजला ' भारत आणि हिंदुस्थान ' या विषयावर माहिती. सांगण्यासाठी. वडिलधाऱ्यांनी सरोजची कानउघडणी केली, " अगं एवढ्या मोठ्या माणसासमोर काय मागावं तुला कळतं का ? " पण मुलांसाठी असा वेळ काढायला तात्यांना आवडत असे.

अज्ञातवासात असताना तात्या पुरुषोत्तम वैद्य या नावाने वावरत होते. त्या वेळेला त्यांना भेटलेली एक मानसकन्या ( मोठ्याच्या सुशीलाबाई सप्तर्षी ) सांगतात, " मामा मला रोज गोष्ट वाचून दाखवायचे. पण गोष्ट अर्धी वाचायचे आणि सांगायचे, आता यापुढची तूच वाच. मी त्यांच्याबरोबर फिरायला जात असे. मग ते मला आकाशातील ग्रहगोलांची माहिती सांगत. वाटेतल्या प्रत्येक झाडाबद्दल त्यांना माहिती असे. "

तात्या एका ठिकाणी जेवायला गेले होते. दुपारच्या वेळेला पंक्तीवर पंक्ती उठत होत्या. तेवढ्यात एका गृहस्थांची दोन रुपयांची हरवलेली नोट, जेवायला बसलेल्या एका मुलाच्या खिशात सापडली. लगेच जमलेल्या सगळ्यांनी कावकाव सुरू केली. त्या मुलाला जेवायच्या पंक्तीतून उठवण्यात आले. तात्यांना हे दृश्य पाहवेना. त्यांच्यातले पितृ-वात्सल्य जागे झाले. तात्यांनी त्याला प्रेमाने जवळ घेतले आणि विचारले,

" बाळ, तू खरंच चोरी केलीस का ? कशासाठी चोरी केलीस ? तू खरं सांग. मी तुला शिक्षा करणार नाही. "

तात्यांच्या मृदू शब्दांनी तो मुलगा हुंदके देऊन रडू लागला. त्याने सगळा झाला प्रकार सांगितला. तो एका गरीब विधवा स्वयंपाक करणाऱ्या बाईचा मुलगा होता. शाळेची फी भरायला त्याच्याकडे पैसे नव्हते. फी दिली नाहीस तर शाळेतून काढून टाकीन, असे मास्तरांनी सांगितल्यामुळे त्याने ती नोट चोरली. तात्यांनी त्याला समजावून सांगितले, " त्यासाठी चोरी करू नये. श्रीहरीने आपल्याला हे दोन हात दिलेत. कुठेतरी थोडा वेळ काम करून पैसे मिळवावेत." तात्यांनी त्याला फीसाठी पैसे दिले आणि स्वतःच्या हातांनी जेवू घातले.

येवल्याला एका ठिकाणी सभेमध्ये भाषण द्यायला तात्यांना बोलावले होते. त्यांची दोन्ही मुले कमल आणि वामन लहान होती. एका कडेवर वामनला व एका कडेवर कमलला घेऊन त्यांनी तब्बल दीड तास उभे राहून व्याख्यान दिले. तात्यांना मुलांबद्दल काय वाटत होते, हे सांगायला असे बोलके उदाहरण पुरे आहे.

एकदा तात्या राहात होते, तिथली मुले गोट्या खेळत होती. घरातील कुणीतरी वडीलधारे माणूस तिथल्या एका मुलाला रागवत होते, " बंद कर हा गोट्यांचा खेळ. गोट्या खेळून काही कुणाचे भले होणार नाही. जरा विद्या शीक. "

तात्यांच्या कानावर हे शब्द पडले आणि ते मध्ये पडले. त्या गृहस्थांना समजावून सांगू लागले. " अहो, गोट्या खेळण्यात वाईट काय आहे ? मी सुद्धा लहानपणी खूप गोट्या खेळलो आहे. आत्ता गोट्या खेळता आल्या नाहीत, तर पुढे नेमबाजी कशी करणार ? बंदूक कशी वापरणार ? सर्व मुलांनी सैनिकी शिक्षण घ्यायला हवं. प्रत्येकाला शस्त्र- विद्या आणि अस्त्रविद्या यायला हवी." तात्या नुसते असे बोलून थांबले नाहीत तर लगोलग मुलांच्या बरोबरीने गोट्या खेळू लागले. तात्यांची अचूक नेमबाजी पाहून मुले सुद्धा अवाक् झाली.

मोठ्या माणसांच्या दृष्टीने तात्या सेनापती असतीलही, पण मुलांच्या दृष्टीने ते जवळचे मित्रच होते. ' प्रौढत्वी निज शैशवास जपणे ' हे वर्णन तात्यांना पुरेपूर लागू पडते.

***

# दोन पांडुरंग

पंढरपूरच्या ' विटेवरी उभा कटेवरी हात ' या पांडुरंगाच्या बरोबरीने आणखी दोन पांडुरंग मराठी माणसाच्या गळ्यातले मौक्तिक मणी म्हणून शोभले. त्यांपैकी एक म्हणजे कै. पांडुरंग सदाशिव साने, म्हणजेच साने गुरुजी. तर दुसरे, कै. पांडुरंग महादेव बापट म्हणजे सेनापती बापट. ही दोन व्यक्तिमत्त्वे घडवताना विधात्याने एकाच रसायनाचा वापर केला की काय न कळे. पण या दोन व्यक्तींच्या विचारांत, स्वभावांत आणि कार्यात कमालीचे साम्य आढळले. दोघेही थोर देशभक्त. स्वातंत्र्याच्या चळवळीत दोघांनीही हिरिरीने भाग घेतला व असंख्य वेळा तुरुंगवास भोगला. दोघेही लेखक आणि कवी होते. त्यांचे बरेचसे साहित्य तुरुंगवासात तयार झाले. मुलात मूल होऊन रममाण होण्याची जादू दोघांनाही साधली होती. वृत्तीने साने गुरुजी थोडे हळवे आणि अंत:करणाचे मृदू, तर सेनापती अधिक कणखर आणि तडफदार बाण्याचे. पण आधुनिक संत हे वर्णन दोघांनाही लागू पडावे. सर्वांत विलक्षण योगायोग म्हणजे या दोन्ही पांडुरंगांचा जन्म एकादशीचाच.

साने गुरुजी पुण्याला कॉलेजमध्ये शिकत होते. सेनापती त्यांच्या मामांच्या दारावरून देशभक्तीपर गाणी म्हणत जात. सेनापतींची अशी अनेक गाणी साने गुरुजींनी पाठ केली होती. प्रत्यक्ष भेट किंवा बोलणे झाले नाही तरी सेनापतींच्याबद्दल साने गुरुजींच्या मनात पूर्ण भक्तिभाव होता. पण त्यांचा स्वभाव संकोची होता. सेनापतींना त्यांनी प्रथम पाहिले १९३७ मध्ये, खानदेशात एरंडोल गावी. त्यानंतर जळगाव, धुळे, अमळनेर अशा ठिकठिकाणी त्यांना

सेनापतींचा अधिक सहवास लाभला. सेनापतींच्या बरोबर ते सफाई-कामात सहभागी व्हायचे, पण बोलणे फार कमी वेळा होई. रवींद्रनाथ टागोर म्हणायचे, "माझ्या देवाची मी त्याच्या नकळत पूजा करतो." साने गुरुजींच्या मनात सेनापतींच्याबद्दल काहीसा असाच भाव होता.

साने गुरुजी म्हणजे तर सेवामूर्ती.

" कधी करावा पथ साफ छान
कधी हरावी मलमूत्र घाण
बघून रोगार्त करीन घाई
बनेन त्याची निरपेक्ष आई
जया न कोणी प्रभू मी तयाचा
तदर्थ हे हात, तदर्थ वाचा."

या कवितेतील ओळी म्हणजे प्रत्यक्ष साने गुरुजींचे जीवनच. पण या सेवाव्रताची प्रेरणा त्यांना मुख्यत: सेनापतींपासून मिळाली. सेनापतींचे आणि महात्माजींचे सेवाकार्य पाहिल्यानंतर साने गुरुजी परमेश्वराजवळ कबुली देतात,

" हृदयात सेवा, वदनात सेवा
उतरे न हातांत करु काय देवा ?"

अर्थात् यात साने गुरुजींच्या स्वभावातील विनयच दिसून येतो.

सेनापतींचे वर्णन करताना साने गुरुजी म्हणतात,

" सेनापती म्हणजे मला शिवाजी, रामदास आणि तुकाराम यांची त्रिमूर्ती दिसते. लोकमान्य, महात्माजी आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे मधुर मिश्रण सेनापतींच्यात आहे. सेनापती म्हणजे भक्ती, ज्ञान व सेवा यांची त्रिपदा गायत्री."

साने गुरुजी आणि सेनापती बापट यांची युती उठून दिसते, पंढरपूरच्या विठ्ठल-मंदिर-प्रवेश प्रकरणात, ही घटना घडली प्रत्यक्ष १९४६ साली. पण त्या आधी कित्येक वर्षे त्याची पूर्वतयारी होत होती. महात्मा गांधी आणि डॉ.

बाबासाहेब आंबेडकर यांच्यात पुणे-करार होण्याआधी गांधींनी अस्पृश्यतेचा प्रश्न सुटावा यासाठी उपोषण केले. हरिजन सेवा संघाच्या मार्फत त्यांनी हरिजनांच्या उद्धारासाठी प्रामाणिक प्रयत्न केले. पण तरीही समाजातली अस्पृश्यता जाईना. हे का होत नाही याबद्दल साने गुरुजींच्या मनात रुखरुख लागून राहिली. पंढरपूरला दरवर्षी आषाढी-कार्तिकीसाठी असंख्य वारकरी जमतात. पण विठ्ठल-मंदिरात हरिजनांना प्रवेश नाही. देवापासून भक्ताला दूर लोटले जात आहे, याची खंत गुरुजींच्या मनात दिवस-रात्र होती. या संबंधात साने गुरुजींचा आणि विनोबांचा बराच पत्रव्यवहार झाला. मंदिर-प्रवेशाचा लढा प्राणपणाने लढावयाचा असा गुरुजींच्या मनाचा निर्धार झाला. पंढरपूरचे मंदिर हरिजनांसाठी खुले व्हावे, यासाठी मी एकादशीपासून आमरण उपोषण करणार, असे गुरुजींनी जाहीर केले. या वार्तेने उभा महाराष्ट्र हादरला. एस्. एम्. जोशी, सेनापती बापट, अच्युतराव पटवर्धन अशा अनेकांनी गुरुजींना उपोषण मागे घ्या म्हणून विनंती केली. सहा महिने महाराष्ट्रभर प्रचार करून जनतेचे मन वळवून आम्ही प्रयत्न करू असे त्यांनी आश्वासन दिले. गुरुजींनी उपोषण मागे घेतले. पण आता हा प्रश्न सोडविण्यासाठी झंझावती प्रचार मोहीम सुरू झाली. जानेवारी १९४७ पासून या प्रचार-मोहिमेला सुरुवात झाली. साने गुरुजी आणि सेनापती बापट ही जोडी पायाला चाके लावल्याप्रमाणे गावोगावी, खेडोपाडी प्रचाराकरता हिंडली. जिथे गुरुजी गेले तिथे सेनापती होतेच. मंदिर-प्रवेशाबाबत जनतेचा कौल मागण्यात आला. त्यासाठी अनुकूल असणाऱ्या हजारो भाविकांच्या सह्यांची मोहीम सुरू झाली. पण विठ्ठल-मंदिराच्या बडव्यांनी जनमताचा कौल मानण्याचे नाकारले. सर्व ठिकाणच्या दौऱ्यांतील पाच लाख चार हजार श्रोत्यांनी मंदिर-प्रवेशाला अनुकूल कौल दिला. पण मंदिराचे दरवाजे उघडलेच नाहीत. आणि मग साने गुरुजींनी आधी जाहीर केल्याप्रमाणे प्राणांतिक उपोषणाला सुरुवात केली. १ मे १९४७ रोजी साने गुरुजी आणि सेनापती बापटांनी चंद्रभागेत स्नान केले. प्रचंड जनसमुदायासमोर गुरुजींचे भाषण झाले. आणि लगेचच तनपुरे महाराजांच्या मठात उपोषणाला सुरुवात झाली. गुरुजींचा निर्धार

कायम होता. महात्माजी आणि विनोबा यांनी हे उपोषण थांबवा म्हणून गुरुजींना आदेश दिला. पण गुरुजींनी तो मानला नाही. अनेक थोरा-मोठ्यांनी मध्यस्थी केली. बडव्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न झाला. बडव्यांपैकी तरुणांचे हृदय-परिवर्तन करण्यात यश आले. मंदिर खुले करण्यासंबंधी बडव्यांनी बहुमताने मॅजिस्ट्रेटपुढे निवेदन दिले आणि १० मे १९४७ रोजी साने गुरुजींनी उपोषण सोडले. या लढ्याच्या निमित्ताने महाराष्ट्राचे दोन पांडुरंग, साने गुरुजी आणि सेनापती बापट जणू एकरूप झाले.




दोन पांडुरंग

साने गुरुजी अत्यंत हळवे होते. दुष्ट प्रवृत्तींशी लढताना आपला निभाव लागत नाही, हे त्यांना कळून चुकले आणि अखेरीस ११ जून १९५० रोजी झोपेच्या गोळ्या घेऊन त्यांनी जीवनयात्रा संपवली. गुरुजींच्या अशा अकाली

निधनाने सेनापती हळहळले. गुरुजींच्या अंत्यविधी प्रसंगी स्मशानात त्यांचे भाषण झाले.

" गुरुजी तुमचा मोठेपणा तुमच्या मृत्यूनंतर उमगला. प्रेमाच्या बाबतीत गुरुजी मी तुमची फक्त ईश्वराशीच तुलना करू शकतो." असे सेनापतींनी मोठ्या कळवळयाने म्हटले. साने गुरुजींच्या पुण्यतिथीला दरवर्षी सेनापती उपास करीत. ज्या ठिकाणी गुरुजींवर अंत्यसंस्कार झाले, त्याच जागी मृत्यूनंतर माझ्या अस्थी पडाव्यात अशी इच्छा त्यांनी बोलून दाखवली. सेनापतींच्या चाहत्यांनी ही इच्छा पूर्ण केली. दादरच्या स्मशानभूमीत, ज्या ठिकाणी या दोन पांडुरंगांनी अखेरची निद्रा घेतली, तिथे साने गुरुजी कथामालेने क्रांतिस्तंभ उभारला आहे, हा स्तंभ दोन पांडुरंगांच्या एकरूपतेचीच साक्ष देत आहे.

***

म. वा. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
क्र. 2८७६
विषय

# रात्रंदिन युद्धाचाच प्रसंग

मुळशीच्या सत्याग्रहामुळे तात्यांच्या मागे सेनापती ही बिरुदावली चिकटली. आयुष्यातले एक प्रकरण संपले. पण संघर्ष संपलेला नव्हता. संघर्षाची वेळ आली की, सेनापती नेहमीच आघाडीवर असत. संघर्षात उतरण्याची भीती अशी त्यांना कधी वाटलीच नाही.

हैद्राबाद संस्थानात निजाम सरकार प्रजेचे हक्क पायदळी तुडवत होते. बापटांनी तीन ते चार वेळा हैद्राबाद संस्थानात जाण्याचा प्रयत्न केला. पण प्रत्येक वेळी त्यांना पकडून संस्थानाबाहेर घालवण्यात आले. पण जेव्हा जेव्हा संधी मिळेल, तेव्हा त्यांनी निजाम-सरकारच्या अत्याचाराविरुद्ध जनमत संघटित करायला सुरुवात केली. पुन्हा पुन्हा तुरुंगवास, हा प्रकार सेनापतींच्या जीवनात अनेकवार झाला. दरम्यान साने गुरुजींनी पंढरपूरचे मंदिर हरिजनांना खुले व्हावे, यासाठी लढा उभारायचे ठरवले. सेनापती गुरुजींच्या खांद्यास खांदा लावून लढ्यात उतरले.

स्वातंत्र्य मिळाले. ' देशाचा संसार माझे खांद्यावर ' असे म्हणत ज्या ध्येयासाठी सेनापतींनी सारे आयुष्य वेचले ते ध्येय साकार झाल्याचे, देश स्वतंत्र झाल्याचे पाहण्याचे भाग्य सेनापतींना लाभले. पुण्यामध्ये सेनापतींच्या हस्ते शनिवारवाड्यावर राष्ट्रीय निशाण उभारण्यात आले. स्वातंत्र्य मिळाले पण प्रश्न संपले नव्हते. आता परकीयांबरोबर नाही तर स्वकीयांबरोबरचा लढा होता. ३० जानेवारी १९४८. महात्मा गांधींची हत्या झाली आणि जातीद्वेषाने रौद्र स्वरूप धारण केले. गावोगावी ब्राह्मण-वर्गाची घरे जाळली गेली. तात्यांचा मुक्काम त्या

वेळी नगरला होता. सप्तर्षी वकिलांचा वाडा जाळण्यासाठी गावगुंड हातात पलिते घेऊन आले. सेनापती वाड्याच्या बाहेर ताठपणे उभे होते. " एका माणसाच्या दुष्कृत्याची शिक्षा त्या जातीच्या सर्व माणसांना का ? सप्तर्षींचा वाडा जाळायचा असेल, तर आधी मला जाळा." असे त्यांनी ठामपणे सांगितले. सेनापतींच्या नजरेतील जरबच अशी होती की, वाडा जाळायला आलेले गुंड माघारी फिरले आणि त्यामुळे फार मोठे नुकसान टळले.

भाषावार प्रांतरचनेचे वारे वाहू लागले. पूर्वीच्या मुंबई इलाख्याचे महाराष्ट्र व गुजराथ असे दोन तुकडे पडणार हे उघड होते. प्रश्न होता तो मुंबईचा. गुजराथी माणसाचा पैसा आणि मराठी माणसाचे कष्ट यातूनच मुंबईची जडणघडण झाली. मराठी व गुजराथी अशा दोन्ही राज्यांतील माणसे मुंबईवर हक्क सांगू लागली. मुंबई स्वतंत्र ठेवावी अशी केंद्र-सरकारची भूमिका होती. या बाबतीत मराठी माणसावर होणाऱ्या अन्यायाला कुणीतरी संघटितपणे वाचा फोडायला हवी होती. सेनापतींनी निरनिराळ्या पक्षांचे एकत्र असे संयुक्त महाराष्ट्र महामंडळ स्थापन केले. संयुक्त महाराष्ट्र लढ्यासाठी त्यांनी ' सत्याग्रहाची हाक ' नावाची पुस्तिका प्रसिद्ध केली. या पुस्तिकेतील पुढील काव्यमय ओळीतून सेनापतींचा खास मराठी बाणा दिसून येतो.

" महाराष्ट्र मेला तरी राष्ट्र मेले
मराठ्याविना राष्ट्रगाडा न चाले,
खरा वीर वैरी पराधीनतेचा
महारष्ट्र आधार या भारताचा."

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीसाठी संपूर्ण मराठी मुलखात प्रचाराची धामधूम सुरू झाली. या प्रचारातील सिंहाचा वाटा अर्थातच सेनापतींचा. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रचारासाठी वृत्तपत्र काढावे असे आचार्य अत्रे यांना वाटू लागले. या वृत्तपत्राला नाव काय द्यायचे ? सेनापतींनी झटकन् उत्तर दिले, ' मराठा ' सेनापतींच्या हस्तेच या दैनिकाचे उद्घाटन झाले. १२ नोव्हेंबरला सेनापतींचा वाढदिवस होता आणि १८ नोव्हेंबरपासून होणाऱ्या लढ्याचे नेतृत्त्व त्यांच्याकडेच होते. प्रत्यक्ष लढ्यात सेनापतींना त्यांच्या अनुयायांनी भाग घेऊ दिला नाही. पण लढ्याची सर्व सूत्रे त्यांच्यच हातात होती. सत्याग्रहाने उग्र स्वरूप धारण केले. दगडफेक, लाठीमार, अश्रुधूर आणि गोळीबार यांनी थैमान

मांडले. सत्याग्रहातील गोळीबारात कित्येक जण हुतात्मे झाले. अखेरीस १ मे १९५७ रोजी संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न साकार झाले.

सेनापती आता दिवसेंदिवस थकत चालले. पण आयुष्यातील संघर्ष काही कमी होत नव्हते. संयुक्त महाराष्ट्राचा लढा संपतो, तोच गोवा- मुक्ती- संग्रामाचे वारे वाहू लागले. १९४७ साली भारत स्वतंत्र झाला, तरी गोवा पोर्तुगीजांच्याच ताब्यात राहिला. पोर्तुगालचा हुकुमशाहा सालाझार हा स्वतःला वास्को-द-गामाचा वारस समजत होता. गोव्यामध्ये पोर्तगीजांनी दहशतवाद माजवला. गोवा-मुक्तीसाठी सत्याग्रह करणारे पहिले नेते होते सेनापती बापट. सेनापती येणार म्हणून गोव्यात सगळीकडे गवगवा झाला. हे सेनापती कोण आहेत ? कसे आहेत ? हे जाणून घ्यायला गोवेकर जनता आणि पोर्तुगीज अधिकारी सुद्धा उत्सुक होते. हा कोणी तरी बडा लष्करी अधिकारी आहे, अशीच सर्वांची समजूत झाली. प्रत्यक्षात दर्शन घडले ते एका ७५ वर्षाच्या वृद्धाचे. पण तरी सेनापतींच्या रोखाने पोर्तुगीज अधिकाऱ्यांनी बंदुका रोखल्या. एक गोळी सेनापतींना चाटून गेली. त्यांच्या रोखाने मारलेली आणखी एक गोळी एका स्वयंसेवकाने पुढे येऊन स्वतःच्या छातीवर झेलली. सेनापतींना बंदुकीच्या दस्त्याने मारहाण करत भारतीय हद्दीत आणून सोडले. पुढे ले. जनरल चौधरी यांच्या नेतृत्त्वाखाली भारतीय सैन्य गोव्यात शिरले आणि साडेचारशे वर्षानंतर गोव्यात तिरंगा ध्वज फडकला.

आयुष्याच्या अखेरपर्यंत निरनिराळ्या आघाड्यांवर सतत लढत राहणारा सेनापतींच्या शिवाय अन्य कोणी क्वचितच असेल.

***

# श्रीहरीचे बोलावणे आले

सेनापतींच्या आयुष्याची सायंकाळ बरीच रेंगाळली. आपल्या आवडत्या श्रीहरीला भेटायला ते अगदी अधीर झाले होते. पण मृत्यूने त्यांना अनेक वेळा हुलकावणी दिली. त्यांच्या मनीची इच्छा होती की, देशासाठी लढता लढताच मृत्यू यावा. अगदी उतार वयात सुद्धा त्यांनी स्वतःहून सत्याग्रहात झोकून दिले. पण मृत्यू सेनापतींची इतक्या सहजपणे मुक्तता करायला राजी नसावा. त्यामुळे ते शरीराबरोबरच मनानेही थकत चालले. कधी आप्त स्वकीय, सहकारी आपणहून भेटायला येत.

" कसं काय ? ठीक आहे ना ?" म्हणून विचारत. पण सेनापती उदासपणे उत्तर देत, " ठीक आहे हेच वाईट आहे, काही होत नाही हेच वाईट आहे."

१२ नोव्हेंबर १९६७. सेनापतींचा ८८ वा वाढदिवस मोठ्या थाटामाटात साजरा झाला. पण सेनापती आतुरतेने वाट पहात होते श्रीहरीच्या बोलावण्याची. त्यांना जीवनाचा अगदी कंटाळा आला होता. वैतागाच्या भरात त्यांनी यमराजांना पत्रही लिहिले, " माझ्यापेक्षा वयाने लहान आणि बरोबरीच्या माणसांना घेऊन गेलास. मला मात्र एकट्याला ताटकळत ठेवलेस. तुझ्या राज्यातही वशिलेबाजी सुरू झालेली दिसते. मरणासाठी तू आम्हाला क्यूमध्ये उभे करतोस ? तुझ्या दारी सत्याग्रह तरी कसा करावा ?" अखेरीस निमित्त साधे झाले. २४ नोव्हेंबरला रात्री पाणी पिण्यासाठी म्हणून ते उठले आणि स्टुलाला आडखळून पडल्यामुळे मांडीचे हाड मोडले. दवाखान्यात दाखल केले आणि नामवंत

डॉक्टरांचे उपचार सुरू झाले. पण आता जगणे नको असे सेनापतींनी मनाने ठरवून टाकले होते. २६ नोव्हेंबर रात्री १२ वाजून गेले. " एकादशी लागली का रे ?" त्यांनी अस्पष्टपणे कुणाला तरी विचारले. सेनापतींचा अंदाज बरोबर होता. एकादशी सुरू झाली होती. जणूकाही ते या मुहूर्तांचीच वाट पाहात होते. १२ वाजून ४० मिनिटे झाली- २७ नोव्हेंबर १९६७ हा दिवस उजाडला तो सेनापतींच्या मृत्यूची बातमी घेऊनच. सेनापतींचे दर्शन घेण्यासाठी अफाट जनसागर लोटला. सेनापतींच्या इच्छेनुसार दादरच्या स्मशानभूमीत, ज्या ठिकाणी साने गुरुजींच्या देहाचे दहन झाले होते, त्याच जागी सेनापतींच्या देहाचे दहन करण्यात आले. सेनापतींचा अस्थिंकलश पुण्यात आला. आळंदीच्या पात्रात अस्थींचे विसर्जन करण्यात आले. सेनापतींना देशभरातील अनेक थोर व्यक्तींनी आदरांजली वाहिली. पण सेनापतींबद्दल पु. ल. देशपांडे यांनी काढलेले उदगार अत्यंत बोलके आहेत. ते म्हणतात, " तात्या सुटलात ! ज्याच्या भेटीची तुम्हाला अपार ओढ, तो तुमचा सखा तुम्हाला भेटला. मृत्युंजय तुम्ही. जो आम्हाला भेडसावतो, त्याची तुमची दोस्ती. तुम्हा लोकांच्या रूपाने कुठल्याशा तेजाचे तुकडे या धरतीवर आले होते, ते पुन्हा त्या तेजात विलीन झाले. मृताच्या आत्म्याला सद्गती मिळावी अशी प्रार्थना करतात. पण खरं सांगू का तात्या, इथे आहे तीच मृतांची वस्ती. तुम्हीच एक जिवंत या मृतांच्या सोबतीला आला होता. सद्गती हवी आहे ती आम्हाला."

***

# सेनापतींच्या कविता

- १ -

देशाचा संसार, माझे अंगावरी,
ऐसे थोडे तरी, वाटू द्या हो ।
वाटू द्या हो थोडे, तरी प्रत्येकासी,
माझी कासाविसी, याचसाठी ।
याचसाठी तुम्हा, हात जोडीतसे,
कोणी म्हणतसे, वेडा झाला ।
वेडा झाला, देश माऊलींचे साठी,
होते पुण्य गाठी, हेची खरे ।
संकटाचे काळी, हृदयनिवासी,
आपुल्या भक्तासी, धीर देई ।
धीर देई की जो, पर-उपकार,
तोचि तो साचार, धर्मतत्त्व ।
देशसेवेसाठी राबावे काहीसे,
हेचि मज पिसे, सत्य सत्य ।
हरीसाठी तुम्हा, बोलावणे केले,
आले वा न आले, मज काय ।

- २ -

कसाही छळो वैरि सत्याग्रहात ।
कसाही छळो वैरि कारागृहात ॥
आम्ही पांडवांसारखी शिस्त पाळू ।
मनीच्या मनी क्रोध जाळूनी टाकू ॥

- ३ -

मरहट्टे हे हट्टे मर या ब्रीदा जपणारे,
हटातटाने झुंज झुंजता झुंजी खपणारे,
शक्तियुक्तिचे युक्तिशक्तिचे खेळ खेळणारे,
हट्टे मरतील, हट्टे परि हे कधी न वळणारे ।

- ४ -

महाराष्ट्र मेला तरी राष्ट्र मेले,
मराठ्याविना राष्ट्रगाडा न चाले ।
खरा वीर वैरी पराधीनतेचा,
महाराष्ट्र आधार या भारताचा ॥

***

२८६८ - ३६/११/७
BVBK-0402878

# सेनापती बापट यांच्या जीवनातील प्रसंग-विशेष

| | | |
|---|---|---|
| १) | जन्म ( पारनेर ) | १२ नोव्हेंबर, १८८०. |
| २ ) | भीडे गुरुजींच्यासमोर देशसेवेची शपथ | १९०२. |
| ३) | उच्च शिक्षणासाठी लंडनला रवाना | १९ जुलै, १९०४. |
| ४) | ‘ २००७ सालातील हिंदुस्थान ’ या विषयावर क्रांतिकारक व्याख्यान | १९०७. |
| ५) | रशियन मैत्रिणीकडून बॉंब-विद्या हस्तगत | १९०७. |
| ६) | मायदेशी परत व लोकमान्यांची भेट | १९०८ |
| ७ ) | साडेचार वर्षांचा अज्ञातवास. | १९०८ ते १९१२. |
| ८ ) | मुळशी-सत्याग्रहाचे नेतृत्त्व | १९२१. |
| ९ ) | सतत साडेसतरा वर्षे ‘आलटून पालटून तुरुंगवास | १९२१-३७. |
| १० ) | गोवा-मुक्ती-संग्रामात भाग | १९५५. |
| ११) | मृत्यू | २७ नोव्हेंबर, १९६७. |

***

# हे सुद्धा वाचायला हवे !

| | | |
|---|---|---|
| १) | आमचे तात्या - सेनापती बापट | इंदुमती फाटक |
| २) | संत सेनापती | पु. पां. गोखले |
| ३) | सेनापतींच्या जीवनगाथा | नाथ ताम्हाणे |
| ४) | सेनापती बापट दर्शन | आपटे गुरुजीं |
| ५) | सेनापती बापट यांचे चरित्र | लालजी पेंडसे |
| ६) | अधुनिक दधिची ऋषी | द. स. हर्षे |
| ७) | आमचे सेनापती | बाळूकाका कानिटकर |
| ८) | सेनापतींच्या समाधीवर भाग १ व २ | संग्राहक - द. मो. भावे |
| ९) | अबोल आत्मयज्ञ | द. मो. भावे |
| १०) | सेनापती बापट-समग्र वाङमय भाग १, २ व ३ | |
| ११) | सेनापती | श्री. शं. नवरे |

***